**मे. सौभाग्य मर्केंटाइल लिमिटेड (एसएमएल), बी-६१, मजला ६, प्लॉट कमांक २१०, बी-विंग, मित्तल टॉवर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१ यांनी त्यांच्या प्रस्तावित मार्की मांगली IV कोळसा खाण, मौजा हिरापूर, मांगली आणि भेंडाळा, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ येथील प्रस्तावित उत्पादन ०.२ दशलक्ष टन वर्ष कोळसा करीता खाण पट्टा क्षेत्र २०१.६९ हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

दिनांक : ०६/०३/२०२६
वेळ : सकाळी ११:०० वाजता
स्थळ : माईन साईट जवळ, मौजा मांगली, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र.

**प्रस्तावना:-**

मे. सौभाग्य मर्केंटाइल लिमिटेड (एसएमएल), बी-६१, मजला ६, प्लॉट कमांक २१०, बी-विंग, मित्तल टॉवर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१ यांनी त्यांच्या प्रस्तावित मार्की मांगली IV कोळसा खाण, मौजा हिरापूर, मांगली आणि भेंडाळा, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ येथील प्रस्तावित उत्पादन ०.२ दशलक्ष टन वर्ष कोळसा करीता खाण पट्टा क्षेत्र २०१.६९ हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक ०३ जून, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. सौभाग्य मर्केंटाइल लिमिटेड (एसएमएल), बी-६१, मजला ६, प्लॉट कमांक २१०, बी-विंग, मित्तल टॉवर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई — ४०००२१ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २१/११/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली होती. परंतु होळी या सणामुळे सदर जनसुनावणी घेणे अशक्य होत असल्याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी २२/०१/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे पत्र सादर केले. त्या अनुषंगाने दि. ०६ मार्च, २०२६ रोजी आयोजित करण्यास मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २९/०१/२०२६ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. परंतु दि. ०३/०३/२०२६ रोजी होळी या सणामुळे सदर जनसुनावणी दि. ०६/०३/२०२६ रोजी आयोजित करण्यात येत असल्याबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ३०/०१/२०२६ रोजी शुद्धीपत्रक प्रकाशित केले. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, ३ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, व्हीसीए समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर-१.
४. प्रादेशिक कार्यालय/उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६. जिल्हा परिषद, यवतमाळ.
७. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८. उप-विभागीय कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
९. नगर पंचायत झरी जामनी, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१०. तहसिल कार्यालय झरी जामनी, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
११. पंचायत समिती कार्यालय झरी जामनी, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१२. ग्राम पंचायत कार्यालय मांगली, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१३. ग्राम पंचायत कार्यालय हिरापूर, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१४. ग्राम पंचायत कार्यालय भेंडाळा, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१५. ग्राम पंचायत कार्यालय अर्धवन, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१६. ग्राम पंचायत कार्यालय येदलापूर, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१७. ग्राम पंचायत कार्यालय मुकुटबन, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.

१८. ग्राम पंचायत कार्यालय बैलमपुर, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
१९. ग्राम पंचायत कार्यालय राजूर, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
२०. ग्राम पंचायत कार्यालय पिंपरड, ता. झरी जामनी, जि. यवतमाळ.
२१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-१३/२०२६ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२६०२१७-एफटीएस-०१५२ दिनांक १७/०२/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १९ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्त:-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. विकास मीना, भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन

- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. रविंद्र सुधाकर पोलेवार, भेंडाळा-रुईकोट, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या जनसुनावणीकरिता कंपनीचे मालक उपस्थित आहेत काय? शेतकऱ्यांच्या जमीनी खाण प्रकल्पात गेल्यानंतर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नूकसान होणार आहे. प्रदूषणात वाढ होणार आहे, आरोग्यावर विपरीत परिणाम होणार आहे. माझी कंपनीच्या प्रमुखांना विनंती आहे की, त्यांनी शेतकयांची फसवणूक करू नये. शेतकऱ्यांच्या जमीनी कंपनीने थेट विकत घ्याव्या. एक एकराच्या क्षेत्रातून रू. ६.५ कोटी किंमतीच्या कोळशाचे उत्खनन केले जाते व त्यामागे रू. ३.७५ कोटी खर्च करण्यात येतो. कंपनीच्या मालकाला रू. १.७५ कोटी रूपयांचा नफा मिळतो. कंपनीच्या मालकाला विनंती आहे की त्यांनी एकरी रू. ५०.० लक्ष या दराने शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी कराव्या जेणेकरून स्थानिक शेतकरी दुसऱ्या ठिकाणी जमीन विकत घेऊ शकणार. आजच्या परिस्थितीत रू. ५० लक्ष ते रू. ६० लक्ष पेक्षा कमी दराने शेतजमीन बाजारात उपलब्ध नाही. खाणीतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून सदर पाणी नदीमध्ये सोडण्यात यावे तसेच परिसरातील गावांना उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच कंपनीने कोळशाच्या वाहतूकीकरिता पर्यायी रस्त्याची सुविधा करावी जेणेकरून राज्य महामार्गाची दुर्दशा होणार नाही. आम्ही राज्य महामार्गावरून कंपनीची वाहतूक होऊ देणार नाही. मुकुटबन परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. अस्तित्वात असलेल्या मे. बी.एस.इस्पात कंपनीने मागील १५ वर्षाच्या काळात एकही शेतजमीन विकत घेतलेली नाही. सदर कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांना आरोग्याच्या समस्या झालेल्या आहेत. भेंडाळा, मांगली, नवी मांगली, जुनी मांगली या भागातील ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत होणार अशा सर्व प्रकल्पग्रस्तांना कंपनीमध्ये नोकरी देण्यात यावी. या परिसरात कंपनीतर्फे दवाखाना उघडण्यात यावा. कंपनीच्या वाहतुकीमुळे जिवीतहानी झाल्यास त्या कुटुंबाला रू. १.३० कोटींची नूकसान भरपाई देण्यात यावी. २०१.६१ हेक्टर जमीन म्हणजेच अंदाजे ६०० एकर जमीन कंपनीने घ्यावयाची असल्याने कंपनीने सर्व शेतजमीनी एकत्र विकत घ्याव्या व त्यानंतरच उत्खनन सुरू करावे. | |

**२) <u>श्री. महेंद्र गोविंदराव चटपल्लीवार, मांगली वार्ड क्रं.३, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने मांगली आदर्श वसाहत पुनर्वसनाचा मुद्दा उपस्थित केला आहे. माझे गांव कंपनीच्या प्रकल्पाच्या मध्यभागी स्थित आहे. कंपनीने माझ्या गावाचे पुनर्वसन न करता उत्खनन सुरू केले तर त्याचा त्रास माझ्या गावाला होणार आहे. कंपनीचे म्हणणे आहे की, ०६ वर्षानंतर गावाचे पुनर्वसन करण्यात येईल. कंपनीने पुढील ०६ वर्षांत माझ्या गावाचे किती नूकसान होणार आहे याचे अंदाजपत्रक मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे सादर करावे. माझ्या गावाचे पुनर्वसन होण्यापूर्वी एखाद्याचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण याची माहिती देण्यात यावी. माझी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की माझ्या गावाचे पुनर्वसन प्रदूषण विरहीत ठिकाणी करावे. माझ्या गावात २० टक्के नागरीकांकडे जमीनी असून उर्वरित मजूर वर्ग आहे. शेतजमीनी कंपनीने अधिग्रहण केल्या तर शेतमजूरांच्या उदर्निर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. शेतमजूरांना देखील नोकरी देण्यात यावी व त्याबाबत लेखी आश्वासन देण्यात यावे. प्रकल्पामुळे नजिकच्या परिसरात देखील प्रदूषण होणार आहे. माझ्या शेतीवर आज आमची तिसरी पिढी उदर्निर्वाह करत आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर शेतपिकांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता असून शेतीच्या उत्पन्नात घट होणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीमुळे शेती करणे आधीच कठीण झाले आहे. आमच्या शेतजमीनी कंपनी घेणार नसल्यान सदर प्रकल्पाला | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, जि. यवतमाळ यांनी सांगितले की, कंपनीने सादरीकरणादरम्यान २-३ गोष्टींवर भर देण्याकरिता सूचित करण्यात आले होते. प्रदूषणासंदर्भात कंपनीच्या उपाययोजनांबाबत बऱ्यापैकी त्यांच्या सादरीकरणामध्ये नमूद केले आहे. तसेच त्यांच्या प्रकल्प कशाप्रकारे टप्प्या-टप्प्याने कार्यान्वित होणार आहे त्याबाबतची माहिती देखील प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या सादरीकरणामध्ये सांगितलेले आहे. या सर्व बाबींचे ध्वनिचित्रफितीकरण करण्यात येत असून जनसुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे. जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांची नोंद ईतिवृत्तामध्ये घेण्यात येत असून त्याचे ईतिवृत्त मंत्रालयाकडे सादर करण्यात येणार आहे. याबाबत योग्य निर्णय मंत्रालयस्तरावर घेण्यात येणार आहे. सर्व उपस्थितांना विनंती आहे की, त्यांनी प्रकल्पाविषयीचे त्यांचे म्हणणे व्यवस्थित नोंदवावे. |

| | | |
|---|---|---|
| | मान्यता देण्यात येऊ नये. कंपनीने या क्षेत्रातील सर्व जमीनी विकत घेतल्यानंतरच कंपनीला प्रकल्प कार्यान्वित करण्याची परवानगी देण्यात यावी. स्थानिकांच्या आरोग्यावर प्रकल्पामुळे विपरीत परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबादारी कंपनीने घ्यावी व त्याबाबत लेखी आश्वासन घेण्यात यावे. सदर प्रकल्पामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीकरिता लागणाऱ्या भू-जलाची पातळी खालावणार आहे. या प्रकल्पामध्ये अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या शेतजमीनी या भोगवट क्रं. २ मध्ये येत आहेत. शासनाने जमीनीबाबतचा दर रू. ६० लक्ष प्रतिएकर याप्रमाणे दर निश्चित करून कंपनीला घेण्याचे आदेश द्यावे. कंपनीकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय प्रकल्प कार्यान्वित करण्याची परवानगी देण्यात येऊ नये ही विनंती. | |

### ३) श्री. नेताजी पारखी, मुकुटबन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पर्यावरण विषयक जनसुनावणीमध्ये पर्यावरण हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. यापूर्वी या परिसरात दोन खाणी प्रस्तावित होत्या, त्या कार्यान्वित देखील झालेल्या असून त्या आजच्या परिस्थितीत बंद अवस्थेत आहेत. या परिसरातील जैवविविधता पूर्णत: नष्ट झालेली आहे. अधिभार ढिगाऱ्याची माती वाहून शेतात येते व जमीन नापिक होत आहे. कंपनीने अधिभार ढिगाऱ्याबाबतच्या उपाययोजनांबाबत माहिती दिली आहे. परंतु अस्तित्वा असलेल्या दोन खाणींमध्ये जे काम सुरू आहे त्यामुळे या समस्या उद्भवत आहेत. कंपनीचे फक्त मोठ्या प्रमाणात कोळशाची उत्खनन करणे व जास्ती जास्त प्रमाणात नफा कमविण्याचे उद्दीष्ट असते. हे करत असताना जल, जंगल, जमीन नष्ट होत कामा नये याची कंपनीने काळजी घ्यावी. प्रकल्पांमुळे या परिसरातील हवा, तापमान यांचे मानक बदलतील व याचा मोठ्या प्रमाणात परिणाम भविष्यात भोगावे लागतील. या क्षेत्रात रिलायंसचा सिमेंट प्रकल्प सुरू आहे. सदर प्रकल्पामुळे वातावरणा सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड व कार्बन मोनॉक्साईड सारखे घातक वायु उत्सर्जित होऊन स्थानिकांमध्ये घशाच्या आजाराचे प्रमाण वाढत आहेत. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तसेच ॲलर्जीचे प्रमाण, त्वचेचे रोग याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीची मोबदला रू. ५० लक्ष प्रति एकरप्रमाणे मिळालाच पाहिजे. या परिसरामध्ये शेतीवर स्थानिकांचे जीवनमान अवलंबून आहे. जर या प्रकारे आमच्या जीवनामध्ये अयोग्य प्रकारे हस्तक्षेप होत असले तर ते आम्हाला मान्य नाही. सदर प्रकल्प दोन भागांमध्ये वाटण्यात आलेला आहे, उत्तर व दक्षिण. कंपनीला दक्षिण क्षेत्रामध्ये कमी अडथळे आहेत. कंपनीने फक्त नाला वळविण्याची परवानगी घेतलेली आहे उर्वरित कोणत्याही परवानग्या कंपनीने घेतलेल्या नाहीत. नाला वळविल्यामुळे पाण्याचा प्रवाह बदलण्यात येईल तसेच पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे लगतच्या शेतीचे नूकसान होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी, जनता विरुद्ध कंपनी या संघर्षाला सामोरे जावे लागते. शेतकरी कंपन्यांसोबत भांडत असतात. रस्ते व नाले वळविले जातात. खाणीतून निघणारे अधिभार ढिगारे प्रकल्पाच्या लगतच्या जमीनीत टाकले जातात. सदर प्रकल्पातील दक्षिण भागात अडचणी कमी असल्यामुळे सदर प्रकल्प दक्षिण भागात ६ वर्षांसाठी चालविण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या उत्तर भागात सर्वात जास्त अडचणी येणार आहेत. मांगली गावाची शाळा जवळच आहे व जुनी मांगली व नवी मांगली वसाहतीच्या मध्यभागातून हा प्रकल्प जात आहे. या तिरप्या पट्ट्यामुळे अडचणी निर्माण होणार आहे. गावाच्या पुनर्वसनाबाबत कंपनीकडे कोणत्याही प्रकारचा आराखडा व नियोजन नाही. कंपनीकडे फक्त नाला वळविण्याची परवानगी आहे. सिंचन विभागाची परवानगी, ३३केव्ही, ११ केव्ही, राष्ट्रीय महामार्गाचा, मांगली ते येळापूर या रस्त्याच्या वळविण्याची परवानगी कंपनीला मिळालेली नाही. ज्या खाणी कार्यरत आहेत त्यांनी बऱ्याच कर्मचाऱ्यांचे पैसे थकवल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे स्थानिक नागरीकांना समस्या येतात. स्थानिकांच्या शेती घेतल्यानंतर शेतीवर अवलंबून असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या उदर्निर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. महिलांना खाणींमध्ये रोजगार देण्यात येत नाही. तसेच सन २०११ च्या जनगणनेनूसार कंपनीने रोजगाराची आकडेवारी दिली. परंतु सन २०२६ मध्ये बेरोजगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. त्याबाबत कंपनीकडून कोणत्याही उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. ही सर्व प्रश्न या | |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी अनुत्तरीत आहेत. कंपनीला पेट्रोल डिझेल व्यतिरिक्त सीएनजी, एलएनजी व ई-वाहनांचा कोळशाच्या उत्खनन, अधिभार ढिगाऱ्याचे डंपिंग व वाहतूकीदरम्यान करायचा आहे. कंपनीने एकमुस्तपणे उत्तर व दक्षिण क्षेत्राकरिता शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी करायला पाहिजे. या क्षेत्रात सन २०१६ पासून टिपेश्वर अभयारण्य प्रस्तावित असून त्याचे अंतर फक्त २२५ मीटर इतके आहे. तसेच या क्षेत्रात वाघाचे अस्तित्व असून मनुष्य व वन्यजीव संघर्ष पाहायला मिळते. प्रकल्पामध्ये वन जमीन असल्यामुळे वन्य प्राण्यांचे क्षेत्र बाधित होत असून वन्यजीव शेतामध्ये येऊन शेतीची नासाडी करतात व पाळीव प्राण्यांचा मृत्यू होतो. नजीकच्या क्षेत्रात आणखी एक खाण प्रस्तावित असून त्यामुळे परिसरातील तापमानामध्ये देखील वाढ होणार आहे. कंपनीने दिलेले आश्वासने व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा पूर्णपणे खोटा असतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कलम ३१ व कलम ३३ नूसार उद्योगांवर कारवाई करायला पाहिजे व त्यांच्याकडून दंड वसूल करायला पाहिजे. या सर्व गोष्टींचे अधिकार असताना उद्योगांवर प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणत्याही प्रकारच्या कारवाया करत नाही. जनसुनावणीमध्ये परिसरातील सर्व बाबींचा विचार करावा व पर्यावणाचे संवर्धन होत असेल तरच परवानगी द्यावी. | |

४) **<u>श्री. बंडु ऊर्फ महादेव दामु पारखी, मार्की (बु.), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २००१ पासून या भागामध्ये बऱ्याच जनसुनावण्या पार पडल्या. परंतु जेव्हा या क्षेत्रामध्ये प्रकल्प येतात तेव्हा जनसुनावणीमध्ये कंपनी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संगनमत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांचा जीव जात आहे. सृष्टीमधील जीवजंतुंना जगण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखला गेला पाहिजे. पर्यावरणाच ऱ्हास झाला तर मनुष्याला जीवन जगणे कठीण जाईल. मानव जमात पर्यावरणाचा विभाज्य घटक आहे. पर्यावरणात बदल झाल्यास त्याचा मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होतो. या प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील समाविष्ट असणाऱ्या जनतेची उपजिविका शेतीवर अवलंबून आहे म्हणून | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

शेतीवर जगाणारा प्रत्येक माणूस तो मालक असो वा मजूर, स्त्री असो वा पुरूष त्याला आपल्या देशातील इतर नागरीकांप्रमाणे सुखाने आणि सन्मानाने जगता आले पाहिजे त्यासाठी त्याचा धंदा फायद्याचा झाला पाहिजे. या कोळसा खाण प्रकल्पामुळे या परिसरातील बाधित क्षेत्रात पर्यावरणात बदल होणार असून शेती व्यवसायावर अनिष्ट परिणाम होणार आहे. या झरीजामणी तालुक्यातील परिसरात अनेक प्रकल्प सुरू असून, त्या प्रकल्पधारकाने ठोस उपाययोजना केल्या नसल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे फार मोठे नूकसान झाले आहे. परिसरातील जमीनीतील पाण्याची पातळी दरवर्षी कमी होत आहे. सुरू असलेल्या प्रकल्प धारकांना उचित निर्देश देण्यात यावे.

१) **समान न्याय:-**

हिरापूर, मांगली, भेंडाळा या तीनही गावाच्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनी संपादन करण्यात येऊन त्या शेतकऱ्यांच्या संपूर्ण जमीनी प्रकल्पात समाविष्ट करण्यात याव्या. त्यामुळे तीनही गावाच्या शेतकऱ्यांना समान न्याय मिळेल. नाहीतर ठराविक शेतकऱ्यांच्या जमीनी प्रकल्पात गेल्यावर इतर शेतकऱ्यांना प्रदूषणामुळे शेती करणे कठीण होईल.

२) **शासकीय नियमानूसार कायम स्वरूपी रोजगार:-**

या प्रकल्पामध्ये २०१.६९ हेक्टर जमील घेतली जाणार आहे. तसेच या प्रकल्पामध्ये फक्त २०४ लोकांना रोजगार देण्याचे नमूद केले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी या प्रकल्पामध्ये विकत घेतल्या जाणर आहेत त्या शेतकऱ्यांना वेस्टर्न कोलफिल्डच्या खदानीच्या नियमानूसार कायमस्वरूपी रोजगार देऊन वेस्टर्न कोलफिल्डप्रमाणे वेतन (पगार) देण्यात यावा.

३) **शेअर्स:-**

ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी या प्रकल्पामध्ये घेतल्या जातील त्या शेतकऱ्यांना कंपनीच्या नफ्यातून शेअर्स देण्यात यावे.

४) **पिकाची नूकसान भरपाई:-**

या प्रकल्पाच्या बाधित परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात प्रदूषणामुळे नूकसान

| | | | |
|---|---|---|---|
| | | होणार आहे. त्यांना प्रति हेक्टरी नूकसान भरपाई देण्यात यावी.<br>५) **विकास कामे:-**<br>मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आदेशानूसार विकास कामे प्रकल्पाच्या बाधित गावात करण्यात यावे. कारण सुरू असलेल्या प्रकल्पधारकाकडून काही ठराविक गावातच विकास कामे केली जातात. कोळसा प्रकल्प मार्की-मांगली या नावाने असून मौजा मार्की (बु.) येथे सीएसआर फंडातून एकही विकास कामे झाली नाहीत.<br>६) **जलसाठा व्यवस्थापन:-**<br>कोळसा खदानीमधून जमीनीत पाण्याचा जो उपसा केला जातो त्यासाठी तलावाची निर्मिती करण्यात यावी. तलावात साठवणूक केलेले पाणी शुद्ध करून बाधित परिसरातील शेतकऱ्यांना मोफत सिंचनासाठी देण्यात यावे.<br>७) **वृक्ष लागवड:-**<br>प्रस्तावित प्रकल्पाच्या अहवालामध्ये १ हेक्टरमध्ये १५०० वृक्ष लागवड करण्याचे नमूद केले आहे. याच नियमानूसार सुरू असलेल्या प्रकल्पामध्ये हेक्टरी १५०० वृक्ष लागवड केल्याची माहिती सादर करण्यात यावी. इतर प्रकल्प धारकाप्रमाणे या प्रकल्प धारकराने हेक्टरी १५०० प्रमाणे वृक्ष लागवड केली नाही तर याची जबाबदारी कोण घेणार आहे. म्हणजे पर्यायाने निसर्गाचा ऱ्हास होणार आहे.<br>८) **खनन व पुनर्भरण:-**<br>कोळसा खाणीमध्ये खाणकाम सुरू केलेल्या सातव्या वर्षानंतर खनन व पुनर्भरण एकाच वेळी करण्याचा नियम आहे. हा नियम पाळला जात नाही. आमची फसवणूक केली जाते.<br>९) **जंगली जनावरे नियोजन:-**<br>या प्रकल्पाच्या बाधित परिसरामध्ये वाघ, रानडुक्कर असे अनेक प्रकारचे जंगली जनावरे आहेत. जंगली जनावरांची नोंद घेण्यात आली नाही. रानडुक्कराच्या त्रासामुळे संपूर्ण शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान केले जाते. या कोळसा खाणीमुळे रानडुक्करांची संख्या वाढत जाणार असून शेतकऱ्यांचे फार मोठे नूकसान | |

| | | |
|---|---|---|
| | होणार आहे. यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहे.<br>१०) **आरोग्याची हमी:-**<br>या कोळसा खाणीच्या प्रदूषणामुळे बाधित परिसरातील जनतेचे आरोग्य धोक्यात येणार आहे. जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रकल्पधारकाने दवाखाना आणि तज्ञ डॉक्टरांची व्यवस्था करून मोफत आरोग्य सुविधा पूरविण्यात याव्या.<br>११) **वाहतूक व्यवस्था नियमावली:-**<br>कोळसा वाहतूक करण्यासाठी प्रकल्पधारकाने स्वत:चा रस्ता तयार करावा त्यामुळे अपघात होणार नाही. कोळसा वाहतूक करताना प्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.<br>१२) **पायाभूत सुविधा:-**<br>प्रकल्पाच्या बाधित परिसरातील जनतेला शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते, कृषी व पशुसंवर्धन यासारख्या पायाभूत सुविधा पूरविण्यात याव्या. आमच्या परिसरातील कोळसा खनन होत असल्याने बाधित परिसरातील शेतकऱ्यांना कृषी पंपाचा दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा. नाहीतर कोळसा आमचा आणि वीज मुंबईला असे होऊ नये.<br>१३) **जमीन खरेदी-समान मोबदला:-**<br>शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी करताना सर्व शेतकऱ्यांना समान मोबदला देण्यात यावा. तो जमीनीचा प्रसार माध्यमांद्वारे जाहीररीत्या प्रसारित करण्यात यावा त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही.<br>१४) **कृषी मागदर्शन:-**<br>बाधित परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रदूषणामुळे होणारे नूकसान टाळण्यासाठी कृषी मेळाव्याच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात यावे.<br>वरील नमूद केलेले आक्षेप प्रकल्पधारक पूर्ण करू शकत नसेल तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

५) **श्री. अमर नामदेवराव सातघरे, मौजा हिरापूर, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत ख. नं. १०० मौजा हिरापूर, ता. झरीजामनी येथे आहे. आमच्या पूर्वजांनी या जमीनीचे संगोपन केले असून आज आम्ही या जमीनीवर विविध प्रकारचे पिक घेत आहोत. या पिकांमुळे आमचे उदर्निर्वाह होत आहे. तसेच संपूर्ण गावाचे उदर्निर्वाह शेतीमुळे होत आहे. कुठलाही प्रकल्प असला की त्याचे फायदे तसेच तोटे देखील असतात. जमीन अधिग्रहीत झाली तर दुसऱ्या ठिकाणी जमीन घेणे कठीण झाले कारण जमीनीचे दर गगनाला भिडले आहेत. जमीनीला योग्य दर मिळाला पाहिजे. या तालुक्यात अनेक खाण प्रकल्प सुरू झाले आहेत. खाणीच्या अहवालामध्ये नमूद उपाययोजनांची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. अस्तित्वात असलेल्या खाणींप्रमाणे या प्रकल्पाचे काम होतो कामा नये. सदर प्रकल्प कोणत्या अडथळ्याशिवाय सुरू राहीला पाहिजे. प्रकल्पधारकाने आमच्या गावाच्या रस्त्याचा वाहतूकीकरिता वापर करू नये. त्या रस्त्याच्या नजीक शाळा असल्याने विद्यार्थ्यांचा वावर असतो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कंपनीने वाहतूकीचे नियोजन सर्वप्रथम करावे. कंपनीतर्फे या परिसरात औद्योगिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे. त्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षणाकरिता इतर गावात किंवा इतर जिल्ह्यात जाण्याची गरज पडणार नाही. कंपनीने शेतकऱ्यांना रू. ५० लक्ष प्रति एकर प्रमाणे मोबदला द्यावा जेणेकरून शेतकऱ्यांचा फायदा होईल. तसेच प्रत्येक कुटंबातील किमान एका व्यक्तिला कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा. कंपनीने सीएसआर निधीबाबत सर्व गावकऱ्यांसोबत बैठक घेऊन विकास कामे करावी. कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे जेणेकरून स्थानिकांना रोजगारासाठी जिल्ह्याबाहेर जावे लागणार नाही. तसेच याबाबत कंपनीने लेखी आश्वासन द्यावे. झरी तालुक्यातील कुशल विद्यार्थ्यांना कंपनीने सर्वप्रथम प्राधान्य दिले पाहिजे. माझी जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी प्रकल्पासंबंधित सर्व बाबींचा विचार करून प्रकल्पास परवानगी द्यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६) श्री. राजू वसंता कांबळे, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महोदय, विकास हा झालाच पाहिजे हे आम्हाला मान्य आहे परंतु विकास हा आमच्या मुलांच्या आरोग्याशी खेळ करून होणार असेल तर आमचा त्याला विरोध आहे. कोळसा खाणीमधून कोळशाचे उत्खनन होणार त्यामुळे प्रदूषण होणार, स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार व कंपनी त्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत तात्पुरते बजट सादर करणार. मात्र त्याची अंमलबजावणी मागील अनेक वर्षांपासून होत नाही. याबाबतचा वाईट अनुभव या परिसरातील एमपी बिर्ला कंपनी किंवा इतर कोळसा खाण कंपन्यांबाबत आहे. इतर कंपन्यांसारखा या कंपनीचा देखील वाईट अनुभव आल्यास आमचा या प्रकल्पास सक्त विरोध आहे. आम्ही ग्रामवासी मांगली येथील ग्रामस्थ, प्रस्तावित कोळसा खाण प्रकल्पाच्या जनसुनावणी निमित्त खालील नमूद मुद्दे 'भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत कायदा, २०१३', 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' आणि 'MMDR Act (DMF)' मधील तरतूदींनूसार सादर करत आहोत:-<br>१) **भूसंपादन आणि योग्य मोबदला (LARR Act, २०१३)**<br>**कलम २६ ते ३० नूसार:** प्रकलपबाधित जमिनीचा मोबदला हा प्रचलित बाजारभावाच्या ४ पट (ग्रामीण क्षेत्र) असावा. केवळ जमीनीचाच नव्हे, तर झाडे, विहीरी आणि गोठ्यांचे पुनर्मुल्यांकन करून योग्य भरपाई मिळावी.<br>**कलम ३१ (पुनर्वसन):** ज्यांचे घर किंवा जमीन अधिग्रहीत केली जाणार आहे, त्यांना नवीन गावठाणात सर्व नागरी सुविधांसह (रस्ते, पाणी, वीज) पुनर्वसन केल्याशिवाय प्रकल्प सुरू करू नये.<br>२) **रोजगार आणि कौशल्य विकास (Employment Guarantees):**<br>**स्थानिकांना प्राधान्य:** प्रकल्पबाधित कुटुंबातील किमान एका सदस्याला शैक्षणिक पात्रतेनूसार कंपनीत 'कायमस्वरूपी' नोकरी मिळावी.<br>**स्थानिक प्राधान्य:** कंत्राटी कामांमध्येही ७० टक्के पेक्षा जास्त रोजगार स्थानिक तरूणांनाच मिळावा. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, स्थानिकांनी त्यांची मते, सुचना व आक्षेप थोडक्यात मांडावी. पूर्वी उपस्थित झालेल्या मुद्यांचा पुनरूच्चार करण्यात येऊ नये. आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद ईतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. |

**कौशल्य विकास:** कंपनीने गावातच एक कौशल्य विकास केंद्र (Skill Development Center) सुरू करून स्थानिक तरूणांना तांत्रिक प्रशिक्षण द्यावे, जेणेकरून त्यांना खाणीत तांत्रिक पदांवर काम मिळेल.

३) **आरोग्य आणि पर्यावरण संरक्षण (Environment Protection Act, १९८६):-**

**हवा व पाणी प्रदूषण:-** कोळशाच्या धुळीमुळे होणाऱ्या श्वसनाच्या आजारांपासून वाचवण्यासाठी खाणीच्या भोवती ५०० मीटरचा 'ग्रीन बेल्ट' (वृक्षारोपण) तयार करावा.

**आरोग्य सुविधा:** कंपनीने गावात सर्व सुविधांनी युक्त 'मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल' उभारावे, जिथे ग्रामस्थांना मोफत उपचार मिळतील.

**जलस्तर:** खाणीच्या उत्खननामुळे गावातील जलस्तर (Water Table) कमी झाल्यास, कंपनीने गावाला आणि शेतीला मोफत पाणी पुरवठा करण्याची कायदेशीर जबाबदारी घ्यावी.

४) **जिल्हा खनिज प्रतिष्ठाण (DMF) आणि CSR निधी:**

**DMF निधी (MMDR Act, २०१५):** खाण कंपनीने जमी केलेल्या रॉयल्टीचा हिस्सा केवळ आमच्याच गावच्या विकासकामांसाठी (उदा. शाळा, रस्ते व गावातील इतर महत्त्वाच्या कामावर) खर्च व्हावा, याची लेखी खात्री मिळावी.

**CSR (Corporate Social Responsibility):** कंपनी कायद्यानूसार नफ्यातील २ टक्के हिस्सा गावातील डिजिटल शाळा, सौर पथदिवे आणि महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी खर्च करावा.

५) **पायाभूत सुविधा आणि शिक्षण:**

**शाळा:** गावातील जिल्हा परिषद शाळेचे 'आदर्श शाळेत' रूपांतर करून तिथे संगणक लॅब आणि क्रिडांगण विकसित करावे.

**स्वतंत्र रस्ता:** खाणीच्या जड वाहतूकीसाठी गावाबाहेरून 'बायपास' रस्ता तयार करावा, जेणेकरून गावातील अपघातांचे प्रमाण शून्यावर राहील.

| | | |
|---|---|---|
| | ६) **स्ट्रक्चरल ऑडिट:** प्रकल्पाच्या व्याप्तीमुळे व ब्लास्टींगमुळे भविष्यात घरांना तडे जाऊ शकतात. त्यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वी गावातील प्रत्येक घराचे 'Pre-Project Structural Audit' सरकारी यंत्रणेमार्फत करून त्याचा अहवाल ग्रामपंचायतीला द्यावा. नूकसान झाल्यास भरपाईची जबाबदारी कंपनीवी राहील, असे लेखी करारबद्ध करावे.<br>७) **खाण बंद झाल्यानंतरचे नियोजन (Mine Closure Plan):** खाणकाम संपल्यानंतर खड्डे उघडे न सोडता, त्यांचे शास्त्रीय पद्धतीने 'बॅक-फिलींग' करून तिथे वृक्षारोपण करावे, जेणेकरून भविष्यात पर्यावरणाचा समतोल राहील. | |

**७) श्री. सुनिल नागोराव ढाले, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सुनिल नागोराव ढाले, रा. मांगली, ता. झरी, जि. यवतमाळ या पत्राद्वारे सौभाग्य मर्कंटाईल लिमिटेडच्या प्रस्तावित मार्की-मांगली-४ कोळसा खाण प्रकल्पाबाबत माझे खालील आक्षेप नोंदवत आहे:-<br>अ) शेतीवर होणारा परिणात आणि मोबदला:<br>प्रस्तावित प्रकल्पामुळे सुपीक जमीन कायमस्वरूपी नष्ट होणार आहे. सध्याचा शासकीय दर हा बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. आमची मागणी आहे की, सध्याच्या बाजार भावाच्या किमाण चार पट मोबदला प्रत्येक बाधीत शेतकऱ्यांना देण्यात यावा. जोपर्यंत मोबदल्याची संपूर्ण रक्कम (without GST) मिळत नाही तोपर्यंत जमिनीचा ताबा कंपनीला देऊ नये. खाण क्षेत्र हे सुपीक जमीनीवर आहे. कोळसा उत्खननामुळे उडणारी धूळ आजूबाजूच्या शेतातील पिकांवर बसून ज्यामुळे शेतीचे कायमस्वरूपी नूकसान होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न घटेल. खाणीतून निघणारे मातीचे ढिगारे शेतजमीनीजवळ टाकल्यास पावसात ती माती शेतात वाहून येते आणि शेती नापिक होते हे रोखण्यासाठी कंपनीकडे काय ड्रेनेज प्लान आहे? मांगली क्षेत्रातील कितह शेतकरी अल्पभूधारक आहेत आणि या प्रकल्पामुळे ते पूर्णपणे भूमिहीन होणार आहेत का? अशा शेतकऱ्यांना विशेष पॅकेज | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, गावातील घरांचे कंपनीने स्ट्रक्चरल ऑडीट करून अहवालामध्ये समाविष्ट केला तर गावकरी व कंपनीमध्ये वाद होणार नाहीत. कंपनीने कृपया याची नोंद घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | काय आहेत? ज्यांच्याकडे (शेतमजूर आणि भाडेकरू) जमीन नाही पण जे ह्या जमीनीवर मजूरी करून पोट भरतात त्यांच्या उदर्निर्वाहासाठी कंपनी काय तरतूद करणार? जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न कसा सोडवणार?<br>आ) प्रदूषण आणि आरोग्य:-<br>कोळसा खाणीमुळे हवेचे आणि पाण्याचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होण्याची भिती आहे यामुळे स्थानिक नागरीकांना विशेषत: लहान मुले आणि वृद्धांना श्वसनाचे आजार होण्याची शक्यता आहे. खदाणतून उडणाऱ्या धुळेमुळे हवेचे प्रदूषण होणार आहे. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी कंपनीकडे काय प्लॅन आहे.खदानीतून उडणारी धूळ रोखण्यासाठी कंपनीने कोणते ठोस उपाया योजले आहेत. खाणीत होणाऱ्या स्फोटामुळे ५०० मीटर ते १ कि.मी. परिसरातील घरांना तडे जातात. सुनावणीपूर्वी सर्व घरांचे 'स्ट्रक्चर ऑडीट' करून त्याचे फाटो रेकॉर्डवर घेतले आहेत काय? झरी जामणी तालुक्यात आरोग्य सोयीची कमतरता आहे. कंपनी मांगलीत विशेष पल्मोनरी (फुफ्फुस विकार) उपचार केंद्र सुरू करणार काय?<br>इ) रोजगार आणि पुनर्वसन:-<br>प्रकल्पात स्थानिक भुमिपुत्रांना कायमस्वरूपी नोकरी किती लोकांना दिल्या जातील याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद दिसत नाही. ज्यांची जमीन संपादित केल्या जाणार आहे त्यांच्या पुनर्वसनाबाबत आणि मोबदल्याबाबत अद्याप स्पष्टता दिसत नाही. जर पुनर्वसन होणार असेल तर नवीन ठिकाणी शाळा, सुसज्ज दवाखाना, सिमेंट रस्ते, वीज, नाल्या पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय कंपनी करणार का? या प्रकल्पात शेती गेल्यावर आमच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधान राहणार नाही त्यामुळे ज्याच्या जमीनी संपादित केल्या जातील त्या प्रत्येक कुटुंबातील किमान एका सदस्याला कंपनीत कायमस्वरूपी नौकरी देण्यात यावी. कंत्राटी पद्धतीवर काम न देता थेट कंपनीच्या पेरोलवर नोकरी मिळावी. स्थानिक अकुशल कामगारांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन त्यांना प्राधान्याने कामावर घ्यावे. बाधित शेतकऱ्यांना | |

तातडीने प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देऊन त्यांना शासकीय सवलतीचा प्रश्न मिटवून द्यावा.

ई) पर्यावरण आणि वन्यजीव:-

हा भाग व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरीडोरशी संबंधित आहे. हा वाघाच्या स्थलांतराचा मार्ग असल्याने वन्यजीवावर निश्चित परिणाम होऊ शकतो. खाणकामामुळे वन्यजीवाच्या अधिकारावर गदा येईल आणि मानव व वन्यजीव संघर्ष वाढण्याची शक्यता आहे. खाणीतील ब्लास्टींगमुळे त्याचा वन्यजीवावर धोका निर्माण होऊ शकतो. खाणीच्या धुरामुळे व खननामुळे औषधी वनस्पती नष्ट होईल त्यामुळे स्थानिक लोकांना पशु व मानवासाठी उपचार करता येणार नाही. औषधी वनस्पती दुर्मिळ होत चालल्या आहेत. यामुळे तर ते पूर्णपणेच नष्ट होतील व परिसंस्थेची हानी होईल. स्थलांतरीत पक्षी यांचा अधिवास खाणीमुळे नष्ट होईल त्यामुळे दुर्मिळ पक्षी या भागात येणार नाहीत.

उ) जलस्त्रोताची हानी:-

खाणीमुळे आजूबाजूचया विहीरी, नद्या किंवा भूगर्भातील पाणी दूषित होणार नाही याची हमी घेणार का? उत्खननामुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेल्यास शेतीसाठी पर्यायी पाण्याचा स्त्रोत कंपनी करणार काय? मांगली हिरापूर गावाचा नैसर्गिक पाणीपुरवठा स्त्रोतावर (विहीरी, बोअरवेल) काय परिणाम होईल याचा हायड्रोलॉजीकल स्टडी कंपनीने केला आहे का? खदानीचे दूषित पाणी स्थानिक पैनगंगा नदी, नाल्यामध्ये सोडले जाणार नाही यांची तांत्रिक खात्री काय?

ऊ) रस्त्याची दुरावस्था:-

कोळसा वाहतूक करणारे ओव्हरलोड ट्रक गावातील मुख्य रस्त्यावर जाणार का? जर हो असेल तर धुळीमुळे होणारे श्वसनाचे, त्वचेचे आजार आणि अपघाताची जबाबदारी कंपनी घेणार का? कंपनीने ओव्हरलोड ट्रकसाठी वाहतूक मार्ग तयार करावा. मांगली हिरापूर मुख्य रस्त्यावरून कंपनीचा कोणत्याही वाहनाची वाहतूक करण्यात येऊ नये कारण हा लोकांचा मुख्य ये-जा करण्याचा रस्ता आहे.

| | | |
|---|---|---|
| | ऋ) स्थानिकांचे अनुभव आणि विश्वासार्हता:-<br>या आधी जुने प्रकल्प वणी-झरी परिसरात झालेल्या खाणीमुळे अनेक लोक विस्थापित झाले आहे पण त्यांना अजूनही नोकऱ्या किंवा पूर्ण मोबदला मिळालेला नाही. मांगली हिरापूरच्या बाबतीत असे होणार नाही याची लेखी हमी कंपनी आणि जिल्हा प्रशासन देणार का?<br>वरील सर्व मुद्यांचा गांभीर्याने विचार करून जोपर्यंत स्थानिक जनतेचे समाधान होत नाही व पर्यावरणाचे रक्षण सुनिश्चित केले जात नाही आणि लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत या प्रकल्पाची प्रक्रिया पुढे नेऊ नये, ही नम्र विनंती. | |

८) **श्री. आरिफ करीम कच्छी, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | देशाचा विकास होत असताना उद्योग उभारले गेले पाहिजे. परंतु दुसऱ्या बाजूने ज्या क्षेत्रात या प्रकल्पासारख्या कोळसा खाणी उभारल्या जात आहेत त्यामुळे वायु, जल, ध्वनी व मृदा प्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. भारत सरकारच्या वे.को.लि.द्वारे ज्या पद्धतीने उपाययोजना राबविल्या जातात त्याप्रमाणे या क्षेत्रात देखील उपाययोजना राबविल्या गेल्या तर स्थानिकांना लाभ होईल. वे.को.लितर्फे प्रकल्पग्रस्तांना नोकरी, मोबदला व सीएसआर निधीतून विशेष उपाययोजना केले जातात. परंतु या परिसरातील खाजगी कंपन्यामार्फत सीएसआर निधीचा योग्य वापर केला जात नाही. वे.को.लि.प्रमाणे या क्षेत्रातील खाजगी कंपन्यांनी देखील उपाययोजना करावी जेणेकरून स्थानिक शेतकरी व नागरीकांना याचा लाभ होईल. जमीन अधिग्रहण कायद्यानुसार शहरातील जमीनीच्या दरापेक्षा जास्त दर ग्रामीण भागातील जमीनीला मिळाला पाहिजे कारण ग्रामीण भागातील जमीन ही स्थानिकांच्या उपजिविकेचे साधन आहे. शेतीच्या माध्यमातून शेतकरी व शेतमजूरांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्यास मदत होते. शेती अधिग्रहीत झाल्यानंतर शेतकरी व शेतमजूरांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत होणार आहे अशा शेतकऱ्यांना किमान रू. ५० लक्ष ते रू. ६० लक्ष प्रति | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | एकर या दराप्रमाणे मोबदला मिळालाच पाहिजे. आजच्या काळात जमीनीचे दर लक्षात घेता शेती विकत घेणे अशक्य झाले आहे. तसेच एका कुटुंबात एकापेक्षा जास्त सदस्य असतील तर शेतीच्या मोबदल्याची वाटाघाटी होते व एकत्र शेती घेणे देखील अशक्य आहे. शासकीय शेती असो वा खाजगी शेती असो सर्वांना समान मोबदला मिळाला पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजिविकेचा प्रश्न सुटेल. शेतीचे अधिग्रहण टप्प्या-टप्पयाने न होता एकाच वेळी करण्यात यावे. जेणेकरून शेतकऱ्यांना दुसऱ्या ठिकाणी शेती विकत घेणे सोईचे होईल. ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत होणार आहे त्यांना वे.को.लि.च्या नियमाप्रमाणे मोबदला व नोकरी देण्यात यावी. प्रकल्पालगतच्या शेतजमीनीमध्ये भविष्यात उत्पन्न निघणार नसल्याने अशा शेतजमीनीदेखील कंपनीने विकत घेतल्या पाहिजे. तसेच कंपनीने शेतकऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन शेतजमीनीचा व्यवहार करावा कोणत्याही पुढाऱ्याची मध्यस्थता घेऊ नये. शेतजमीनीच्या व्यवहारात मध्यस्थी झाली तर शेतकऱ्यांचे मोठे नूकसान होईल. | |

## ९) श्री. चंद्रकांत घुग्घूल, पांढरकवडा (लहान), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी मे. सौभाग्य मर्कटाईल प्रा. लि. या कंपनीची जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. १५ वर्षांपासून आमच्या झरी तालुक्यामध्ये डोलोमाईट कंपन्या आल्या, त्यानंतर सर्वात मोठा प्रकल्प हा मे. आरसीसीपीएल सिमेंट प्रकल्प आला त्यानंतर आणखी दोन कंपन्या मे. बी.एस.इस्पात व मे. टॉपवर्थ उर्जा ॲण्ड मेटल्स या दोन कोळसा खाणी मागील १५ वर्षांपासून अधून-मधून कार्यरत आहेत. सदर कोळसा कंपन्यांनी फक्त ५-७ वर्ष काम केले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यवतमाळ जिल्ह्यात फक्त जनसुनावण्या घेण्याकरिता येतात. परंतु प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी या ठिकाणी भेट देत नाहीत. या तालुक्यातील कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत आहे. माझी जिल्हाधिकारी साहेबांना विनंती आहे की त्यांनी प्रदूषण नियंत्रण | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत या क्षेत्राची पाहणी करावी जेणेकरून या परिसरातील कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे किंवा कसे याबाबत माहिती मिळणार. औद्योगिकीकरणामुळे शेतकरी व शेतमजूर विस्थापित होत आहेत. सदर कंपनीने शेतकंरी व शेतमजूरांना केंद्रस्थानी ठेऊन औद्योगिकीकरण केले तर आमचा या प्रकल्पाला विरोध नाही. कंपनीने सर्व शेतकऱ्यांच्या जमीनी सरसकट घेतल्या पाहिजे. कंपनीने शेतमजूरांना कंपनीच्या पेरोलवर नोकरी द्यावी, कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्यात येऊ नये. मागील १५ वर्षांच्या अनुभवानूसार कंत्राटदार त्यांच्या कामगारांना त्यांच्या हक्काचा भविष्य निर्वाह निधीचा पैसा त्यांना देत नाहीत. त्यामुळे कंपनीने शेतकऱ्यांच्या वारसांना तसेच शेतमजूरांना व महिलांना देखील कायमस्वरूपी नोकरी द्यावी. तसेच कंपनीने शेतजमीनी घेतेवळी ग्रामसभा आयोजित करून त्या ठिकाणी दराबाबत विचार विनिमय करून शेतीचे दर ठरविण्यात यावे व शेती थेट शेतकऱ्यांकडून विकत घ्यावी. यवतमाळ जिल्ह्यात व झरी तालुक्यात औद्योगिकीकरणामुळे शेतजमीनीचे दर मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. शेतकऱ्यांच्या शेतजमीनी किमान रू. ५० ते ६० लक्ष प्रति एकर या दराप्रमाणे विकत घेण्यात यावी. पैनगंगा नदीच्या पुरामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. खाणीतून निघणारे अधिभार ढिगाऱ्यांची विल्हेवाट नदीच्या विरूद्ध दिशेने लावण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही. कंपनीने उत्खननावेळी नियंत्रित ब्लास्टींगचा वापर करावा जेणेकरून शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही. तसेच ब्लास्टींगकरिता गावातील उच्च शिक्षीत तरूण युवकांची एक समिती नेमण्यात यावी. ब्लास्टींगमुळे स्थानिकांना त्रास होतो व घरांना तडे जातात. सीएसआर निधीचा वापर ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन करण्यात यावा जेणेकरून प्रकल्पग्रस्त गावांमध्ये सुविधा पूरविणे सोईचे होईल. वणी ते पाटणबोरी पर्यंतचा रस्ता हा दोन पदरी रस्ता आहे व या ठिकाणी जवळपास १५-२० चुनखडी व डोलोमाईटच्या खाणी असून त्यांच्याकडून ओव्हरलोड वाहतूक करण्यात येते. ओव्हरलोड वाहतूकीमुळे रस्त्यांची दुर्दशा होत असून अपघातांचे प्रमाण देखील वाढले आहे. कंपनीने शेतकऱ्यांना उचित मोबदला व सर्व गोष्टींचे योग्य | |

| | | |
|---|---|---|
| | नियोजन करून प्रकल्प कार्यान्वित केला तर आमचा या प्रकल्पाला विरोध नाही. | |

१०) **श्री. वासुदेव विधाते, मार्की, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या तालुक्यात बरेच प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत ज्यामध्ये कोळसा खाणी, चुनखडी व डोलामाईट खाणी तसेच सिमेंट उद्योगाचा समावेश आहे. झरीजामणी तालुका हा यवतमाळ जिल्ह्याच्या पूर्व दिशेला चंद्रपूर जिल्ह्याच्या जवळ आहे. हे संपूर्ण क्षेत्र खनिज संपत्तीने विपुल आहे. मागील १५-२० वर्षांपासून या क्षेत्रात जनसुनावण्या घेण्यात येत आहेत. परंतु या जनसुनावण्या होत असताना सातत्याने एक गोष्ट निदर्शनास आली आहे की, या ठिकाणच्या समस्या गंभीर आहेत. जनसुनावण्यादरम्यान आक्षेप नोंदविण्यात येतात परंतु त्याचे कधी समर्पक उत्तरे मिळतात तर कधी मिळत नाहीत. तसेच जनसुनावणी झाल्यानंतर अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत आजपर्यंत स्थानिकांपर्यंत पाहोचलेली नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची अंतिम प्रत ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला पाहिजे जेणेकरून जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या आक्षेपाबाबतचे उत्तर स्थानिकांना मिळाले किंवा कसे याबाबत माहिती प्राप्त होईल. प्रदूषणासंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरिता आम्हाला चंद्रपूर येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात जावे लागते व तेथे शेतकऱ्यांना व्यवस्थित वागणूक मिळत नाही याचा मला प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. जेव्हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचे अवलोकन करण्याकरिता या परिसरातील स्थानिक नागरीक कार्यालयात जातो तेव्हा त्याला विविध प्रकारचे प्रश्न विचारण्यात येतात व धुडकावून लावल्या जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी बेजबाबदारपणे शेतकऱ्यांसोबत वागतात. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची कार्यप्रणाली ही विरोधाभासी आहे. जनसुनावणी झाल्यानंतर जिल्हा प्रशासन देखील स्थानिकांचे ऐकून घेत नाही. या प्रकारचे एक प्रकरण ३ वर्षांपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित होते परंतु त्याबाबत | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जनसुनावणीची तारीख होळी या सणामुळे पुढे ढकलण्यात आली आहे. होळी सणामुळे जनसुनावणीकरिता नागरीकांची उपस्थिती होऊ शकली नसती. जनुसनावणीकरिता स्थानिक नागरीकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असण्याकरिता जनसुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत समाधानकार उत्तरे द्यावी. तसेच कंपनीने रेल्वे व ना-हरकत प्रमाणपत्राबाबत महिती द्यावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रेल्वे विभागाला कंपनीतर्फे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता पत्रव्यवहार करण्यात आला आहे. खाणकाम आराखडा मंजूर करतानाच रेल्वे रूळाचा उल्लेख करण्यात आला होता. रेल्वे विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागेच्या ४५ मीटर अंतरापासून खाणकाम करता येते. खाण सुरक्षा महासंचालनालयाकडून याबाबत मंजूरी घेण्यात येते. या प्रकल्पाच्या कार्यान्वित होण्यापूर्वी खाण सुरक्षा महासंचालनालयाकडून परवानगी घेण्यात येईल. या प्रकल्पाच्या परिसरातून रस्ते वळविण्याबाबत विचारणा करण्यात आली आहे. त्यानूसार आम्ही संबंधित विभागाकडे परवानगीकरिता अर्ज सादर केला असून रस्ते वळविण्याबाबत लागणाऱ्या अंदाजित खर्चाची माहिती तयार करणे सुरू आहे. पर्यावरण मंजूरी प्राप्त झाल्यानंतर याबाबतचे काम सुरू करण्यात येईल व संबंधित विभागाची परवानगी मिळाल्यानंतरच रस्ता वळविण्याचे काम सुरू करण्यात येईल. नाला वळविण्याबाबत परवानगी |

समाधानकारक उत्तर आजपर्यंत मिळाले नाही. सदर प्रकल्पामध्ये तीन रस्ते वळविण्यात येणार आहेत जसे की मांगली-हिरापूर रस्ता-७६० मीटर, मांगली-अर्धवन रस्ता ६०० मीटर व मुकुटबन-पाटण राज्य महामार्ग क्रं. ३१५ या रस्त्याचे सर्वात मोठे डायव्हर्जन आहे जवळपास २१६० मीटर. या डाव्हर्जनसाठी कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी कंपनीने घेतली आहे काय? टर्म्स ऑफ रेफरन्सच्या १.३ मध्ये ॲनेक्शर २.१ व २.३ मध्ये अनुपालन केल्याचे सांगितले आहे परंतु कंपनीने संबंधित विभागाकडे फक्त पत्र सादर करण्यात आले आहे. चॅप्टर क्रं.२ चे अवलोकन केले असता रस्ता वळविण्याची परवानगी मिळालेली नसल्याचे दिसून येते. सिंचन विभागाची परवानगी सदर कंपनीला मिळाली परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी यांना का घेतली नाही? महावितरणच्या विद्युत वाहिन्यादेखील वळविण्यात येणार आहेत त्याची देखील परवानगी घेतली नाही. कंपनीने परवानग्यांच्या प्रती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये जोडलेल्या नाहीत. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांच्या परवानगीशिवाय इतर परवानग्या मिळणार नसेल तर पर्यावरणीय मंजूरी सदर प्रकल्पास मिळणार कशी? त्यामुळे जनसुनावणीदरम्यान जनतेच्या मताची दखल घेतली जात नाही असा आमचा आरोप आहे. या ठिकाणी सदर प्रकल्प व्हायला नको. कोळसा मंत्रालयाने या ब्लॉकचे वितरण करायला नको होते. या खाण प्रकल्पामधून रेल्वे मार्ग जात असून प्रवासी वाहतूक होणार आहे. कंपनीने उत्तर व दक्षिण भागात फक्त ४५ मीटरचे बफर झोन ठेवले आहे. प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर ब्लास्टींग होणार आहे. श्री चंद्रकांत यांच्या वक्तव्यानूसार ब्लास्टींगमुळे घरांना तडे जात आहेत. ०१ कि.मी. अंतरावर ब्लास्टींग झाल्यानंतर घरांवर परिणाम होत असतील तर ४५ मीटर अंतरावर असलेल्या रेल्वे रूळावर काय परिणाम होईल याचा अंदाज आपण लावू शकता. ब्लास्टींगमुळे रेल्वे अपघात होण्याची शक्यता आहे. माझी मा. जिल्हाधिकारी महोदयांना विनंती आहे की, जोपर्यंत कंपनीला रेल्वे प्रशासनाकडून ना-हरकत प्रमाणत्र मिळत नाही तोपर्यंत या प्रकल्पाला परवानगी देण्यात येऊ नये. तसेच सदर जनसुनावणी तात्काळ थांबविण्यात यावी. या ठिकाणी जनतेच्या जीवाचा विषय आहे. हा कोळसा

मिळण्यासाठी अर्ज सादर केला असून त्याची परवानगी कंपनीला मिळालेली आहे. काही संबंधित विभागाकडून परवानगी तात्काळ मिळते व काही विभागांकडून परवानगी मिळण्यास विलंब होतो. परंतु संबंधित सर्व विभागांकडून परवानगी मिळाल्यानंतरच पुढचे कार्य करण्यात येईल याबाबत आम्ही आश्वासन देतो. विद्युत पुरवठा वळविण्याबाबत महावितरणकडे अर्ज सादर करण्यात आला होता व त्यांच्यातर्फे पाहणी देखील करण्यात आली आहे. त्याबाबतची परवानगी देखील लवकरात लवकर प्राप्त होईल.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, याबाबत टर्म्स ऑफ रेफरन्सचे अवलोकन करण्यात येईल व त्यानूसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल. आपले आक्षेप मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल व मंत्रालयाच्या निर्णयानूसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. जनसुनावणीदरम्यन उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत असून ते मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल. याबाबत निर्णय घेण्याचे अधिकारी मंत्रालयाकडे असून या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे निर्णय घेण्याचे अधिकार जनसुनावणी समितीकडे नाही. सदर जनसुनावणीचे छायाचित्रीकरण करण्यात येत असून त्याचे ईतिवृत्त तयार करून मंत्रालयाकडे सादर करण्यात येतील. तसेच म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर देखील याबाबतची माहिती प्रकाशित करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, ज्या प्रकल्पाचे क्षेत्र दोन जिल्हे किंवा दोन राज्यात विभागली जाते अशा प्रकल्पांची जनसुनावणी हा दोन्ही राज्य किंवा दोन्ही जिल्ह्यांमध्ये घेण्यात येते. पूर्वी दोन राज्यात क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पांना जरी ते ब प्रवर्गात मोडली जात असतील तरी त्यांना अ प्रवर्गात मोडण्यात येत होते. या प्रकल्पाचे क्षेत्र २०१ हेक्टर इतके असून त्याकरिता राज्य पर्यावरण

| | | |
|---|---|---|
| | ब्लॉक अवार्ड व्हायलाच नव्हता पाहिजे असे आमचे मत आहे. रेल्वे रूळाच्या मुद्याच्या अनुषंगाने या खाणीला पर्यावरणीय मंजूरी देण्यात येऊ नये. सदर जनसुनावणी कंपनीने अनुपालन अहवाल सादर केल्यानंतरच घेण्यात यावी. या क्षेत्रातील प्रत्येक प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये कोणत्या न कोणत्या प्रकारचे डायव्हर्जन करण्यात येते. कंपनीने कोळसा मंत्रालयाकडे रेल्वेच्या ना-हरकत प्रमाणपत्राची गरज नसल्याचे पत्र पाठविले आहे व दुसरीकडे रेल्वे मंत्रालयाकडे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केला आहे. आम्हाला याबाबत कोणत्याही विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळत नाहीत. आम्ही इतके सक्षम नसून यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. जवळपास २.५ कि.मी ते ३.० कि.मी. अंतराचे रस्ते वळविण्यात येणार असून त्याचा खर्च कोण करणार याची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद नाही. तसेच वीज वाहिनी वळविण्यात येईल त्याच्या खर्चाबाबत देखील नमूद नाही. रस्ते खराब झाल्यानंतर त्याकडे वे.को.लि. प्रशासन, जिल्हा प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देत नाहीत. रस्त्याबाबत विविध विभागांतर्फे टोलवा टोलवीची उत्तरे मिळतात. अशाच प्रकारची टोलवा टोलवीची उत्तरे या ठिकाणी देखील होतात. रोजगाराबाबत योग्य तो न्याय मिळत नाही. अनेक उद्योग सुरू होतात व बंद होतात. तसेच कोल ब्लॉक विकत घेतात व काही दिवसांनंतर विकण्यात येतो. उदा. मे. कर्नाटक पॉवर भद्रावती येथे स्वस्त दरात जमीनी विकत घेण्यात आल्या व दुसऱ्या कंपनीला जास्त दरात विकण्यात आल्या. सुरूवातील जनसुनावणी दि. ०४/०३/२०२६ रोजी होणार होती परंतु ती दि. ०६/०३/२०२६ रोजी पर्यंत पुढे ढकलण्यात आली. याबाबत स्पष्टीकरण अपेक्षित आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव यांनी दि. १७/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये आदेश पारीत केले होते. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनूसार जनसुनावणीची तारीख फक्त अतिशय गंभीर कारण असल्याशिवाय पुढे ढकलता येत नाही. ॲनक्शर २.८ चा कागदपत्राचा या प्रकल्पासोबत काय संबंध आहे ते कंपनीने स्पष्ट करावे. सदर प्रकल्प महाराष्ट्र व तेलंगणा या दोन राज्यांच्या सीमेवर सुरू होणार आहे. सदर प्रकल्पाची जनसुनावणी | आघात मुल्यांकन समिती यांचेकडून परवानगी मिळू शकते कारण सदर समितीला ५०० हेक्टर क्षेत्रापर्यंत प्रकल्प क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पांनी परवानगी देण्याचे अधिकार आहेत. परंतु त्यामध्ये २.२ कि.मी. अंतरावर अंतरराज्य सीमा येत असलयाने पर्यावरण मुल्यांकन समितीमध्ये विचार करण्यात यावा. या अनुषंगाने टीओआर मध्ये अट तपासण्यात आली व जनसुनावणी एकाच राज्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | ही दोन्ही राज्यांमध्ये होणे गरजेचे आहे. सदर प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येमध्ये तेलंगणा राज्यातील काही गावांचा समावेश असल्याचे दिसत आहे. या जनसुनावणीबाबत त्या राज्याच्या वृत्तपत्रांमध्ये देखील जाहीरात प्रकाशित करणे गरजेचे होते जेणेकरून तेथील नागरीक देखील सदर जनसुनावणीकरिता या ठिकाणी हजर राहू शकले असते. त्याबाबत कंपनीची कोणत्याही प्रकारची योजना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नमूद नाही. सदर कंपनीने नदीच्या पलीकडच्या भागात सर्वेक्षण केले किंवा कसे याबाबतची तपासणी करणे दखील गरजेचे होते. त्यामुळे सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा अपूर्ण आहे असे माझे मत आहे. त्यामुळे सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल रद्द करण्यात यावा. तेलंगणा राज्यातील सर्वेक्षण पूर्ण करून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल परत तयार करून जनसुनावणी परत घेण्यात यावी ही माझी मागणी आहे. कंपनीने जर या अहवालात तेलंगणा राज्यातील जनसुनावणीची तारीख जाहीर केली असती तर हा मुद्दा उपस्थित झाला नसता. सदर प्रकल्पाला पर्यावरण मंजूरी मिळाली तर ही बेकायदेशीरपणे देण्यात येईल व अशा प्रक्रियेमध्ये स्थानिकांना सहभाग नोंदविण्यास जबरदस्ती का करण्यात येत आहे हा आमचा आक्षेप आहे. यापूर्वी सन २०१२ मध्ये एका प्रकल्पाच्या जनसुनावणीदरम्यान आश्वासन देण्यात आले होते की शेजारच्या राज्यात जनसुनावणी घेण्यात येईल परंतु आजपर्यंत ती जनसुनावणी घेण्यात आली नाही. सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अपूर्ण असून त्यावर मा. जिल्हाधिकारी जनसुनावणी घेणार काय हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मा. जिल्हाधिकारी यांना जनसुनावणी रद्द करून पुढे जनसुनावणी घेण्याचे अधिकारी आहेत. यापूर्वी काही प्रकल्पांची जनसुनावणी रद्द करण्यात आली असून २-३ वेळा जनसुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत. सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल रद्द करून नव्याने अहवाल तयार करून सादर करण्याचे आदेश देण्यात यावे व जनसुनावणी नव्याने घेण्यात यावी. ५०० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या प्रकल्पांना 'अ' प्रवर्गात मोडले जाते व ५०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असलेल्या प्रकल्पांना 'ब' प्रवर्गात मोडले जाते. परंतु कार्यकारी सारांश अहवालात सदर प्रकल्पाला 'अ' प्रवर्गात मोडल्याचे दिसून येत आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीने जे स्पष्टीकरण दिले आहे त्याबाबत कागदोपत्री पुरावे सादर करावे. सदर प्रकल्प टिपेश्वर अभयारण्य व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांच्या भ्रमणमार्गावर स्थित आहे. या परिसरामध्ये वाघांचे अस्तित्व आहे. सदर कॉरीडोर अरूंद झाल्यामुळे या क्षेत्रामध्ये मानव व वन्यजीव संघर्षामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांतर्फे रू. ५० ते रू. ६० लाखांपर्यंत मोबदला मिळाण्याची मागणी करण्यात येत आहे. सन २०१४ साली केरळ राज्यातील खाणकामासंदर्भातील एका प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालय केरळ यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात निर्णय दिला होता. त्या निर्णयाविरूद्ध मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील दाखल करण्यात आली होती. सदर निर्णयामध्ये जमीनीतील खनिज संपत्तीवर शेतकऱ्यांचा पूर्णपणे हक्क असल्याचे नमूद आहे. माझे आक्षेप या ठिकाणी नोंदविण्याची संधी देण्यात आली त्याबद्दल मी आभारी आहे. तसेच मी आशा करतो की अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल स्थानिकांपर्यंत प्रशासनातर्फे पोहोचविण्यात येईल. | |

११) **<u>श्री. आशिष फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, शिवसेना (शिंदे गट):-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जमीनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे जमीनी देण्याबाबतचा निर्णय स्थानिक शेतकरी ठरवतील. पूर्वी झरी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात हिरवळ असल्याने आजूबाजूच्या तालुक्यातील पर्यटक या तालुक्यात प्राणवायुचे प्रमाण जास्त असल्याने पर्यटनाला यायचे. परंतु आज या क्षेत्रात एमपी बिर्ला यांचा सिमेंट उद्योग, कोळसा खाण व इस्पात कंपनीची कोळसा खाण कार्यरत आहेत. या पूर्वी झालेल्या जनसुनावण्यांमध्ये निवासी जिल्हाधिकारी यांची उपस्थिती असायची. परंतु आज मा. जिल्हाधिकारी स्वत: या जनसुनावणीला उपस्थित आहेत ही चांगली बाब आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे या क्षेत्रातील प्रदूषणकारी उद्योगांवर कारवाई करण्यात येत नसल्याचा माझा आक्षेप आहे. कंपनीने सादर केलेल्या प्रदूषणाच्या आकडेवारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. झरी तालुक्यातील प्रदूषणात चंद्रपूर, घुग्घूस व वणी तालुक्याइतकी वाढ झालेली आहे. दोन वर्षांपूर्वी | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | यवतमाळ जिल्हा अमरावती प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीत देण्यात आला होता. मा. आमदार साहेबांच्या वतीने प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र देऊन पाठपुरावा करून यवतमाळ जिल्हा परत प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांच्या अखत्यारीत देण्यात आला. या क्षेत्रातील उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्यात येत नाही. ७०-८० टक्के बाहेरच्या युवकांना रोजगार देण्यात येतो व उर्वरित २० टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात येतो. कंपनीला विनंती आहे की, त्यांनी सर्वप्रथम मार्की, मांगली व भेंडाळा गावातील स्थानिक युवकांना रोजगार द्यावा. येथे वे.को.लि.च्या नियमानूसार रोजगार देण्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. परंतु वे.को.लि.सारखी बोगस कंपनी नाही असे माझे मत आहे. जमीनीचा दर शेतकरी ठरवतील. शेतकरी म्हणतील त्या भावाने कंपनीने शेतजमीन विकत घ्यावी. कंपनीच्या नियमाप्रमाणे स्थानिकांना मोबदला व रोजगार देण्यात यावा. मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विरोधात या परिसरातील वाढत्या प्रदूषणामुळे आंदोलन करणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आजपर्यंत स्थानिकांच्या समस्या सोडविल्या नाहीत. या परिसरातील इस्पात कंपनीच्या अनियमित कामामुळे त्या ठिकाणी स्थानिक युवकांचे वेतन रखडले आहे. या जनसुनावणीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी देखील उपस्थित असायला पाहिजे होते. वणी-मुकुटबन रस्त्याच्या बांधकामाचा रू. ८० ते ९० लाख रूपये प्रति किलोमीटरचे अंदाजपत्रक आहे. सदर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली असून सदर रस्ता दोन वर्षांपूर्वी तयार करण्यात आल्याचे दिसत नाही. सदर बांधकामाची चौकशी करण्यात यावी. अहवालामध्ये ३० टन वजनाच्या वाहनांचा उल्लेख करण्यात आला आहे परंतु ४०-५० टन क्षमतेच्या वाहनांद्वारे वाहतूक करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी फक्त जनसुनावण्या घेण्याकरिता या क्षेत्रात येतात. परंतु प्रदूषणासंदर्भात उद्योगांवर कार्यवाही करण्यात येत नाही. प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन आजारी झाले आहेत. याबाबत आमच्यातर्फे आपणाकडे पत्रव्यवहार करण्यात येणार असून यापुढे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाविरोधात आंदोलन करण्यात येणार आहे. प्रत्येक खाणीमध्ये १-२ रूग्णवाहिकेची सुविधा असायला | |

| | | |
|---|---|---|
| | पाहिजे. या प्रकल्पामध्ये रूग्णवाहिकेबाबत माहिती दिलेली नाही. इस्पात कंपनीमध्ये रूग्णवाहिकेची सुविधा नाही. एमपी बिर्ला कंपनीतर्फे आश्वासन देण्यात आले होते की, या क्षेत्रात शाळा, दवाखाने यांची सुविधा देण्यात येईल परंतु आजपर्यंत आश्वासनांची पूर्तता करण्यात आली नाही. स्थानिकांचा प्रकल्पाला विरोध नाही परंतु शेतकऱ्यांच्या शेतजमीनीला योग्य भाव व रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या क्षेत्रातील प्रदूषणाकडे लक्ष दिले पाहिजे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल स्थानिक मराठी भाषेत तयार करण्यात यावे. जनसुनावणीमध्ये नेहमी शेतीला योग्य मोबदला, रोजगार, आरोग्य व प्रदूषण हेच विषय असतात. त्यामुळे या सर्व गोष्टींची पूर्तता कंपनीने करावी. सदर कंपनीचा रू. १.५० कोटी सीएसआर फंड आहे. तर या क्षेत्रातील इस्पात व एमपी बिर्ला या कंपन्यांचा फंड यापेक्षा जास्त असून त्यांनी आजपर्यंत कोणत्याही सुविधा या क्षेत्रात पूरविलेल्या नाहीत. याबाबत भविष्यात मोठ्या प्रमाणात उद्रेक होणार आहे. कंपनीने स्थानिकांना पायाभूत सुविधा पूरवाव्या हीच स्थानिकांची मागणी आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन मोबदला देण्यात यावा. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार देण्यात यावा. या परिसरातील उद्योगांच्या प्रदूषणाविरोधात आंदोलने करण्यात येतील. | |

**१२) श्री. विजय पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, वणी, ता. वणी, जि. यवमताळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व २००९ नूसार कायदेशीर जनसुनावणी होत आहे असे मी समजतो. या ठिकाणी ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत होणार आहेत त्यांनी मोबदला व रोजगाराबाबत मुद्दे उपस्थित केले आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशमध्ये दिलेलया माहितीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या परिसरात कोण-कोणत्या सुविधा पूरविण्यात येणार आहेत व त्याकरिता घेण्यात येणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्राची माहिती स्थानिकांना या अहवालामधून होऊ दिली नसल्याचा माझा आरोप आहे. कोळशाच्या वाहतूकीकरिता ताडपत्रीचे आच्छादन | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जर प्रकल्प प्रवर्तक M-Sand तयार करणार असतील तर त्याबाबत माहिती द्यावी.<br><br>पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, या प्रकल्पातून अंदाजे ४४ दशलक्ष घनमिटर इतके अधिभार ढिगारे निघणार आहे. त्यापैकी ३८.३० दशलक्ष घनमिटर अधिभार ढिगाऱ्यांची विल्हेवाट ही खाण पुनर्भरणामध्ये होणार आहे. शिल्लक राहिलेला ५.७ दशलक्ष घनमिटर अधिभार ढिगाऱ्यामधून रेती बनविण्यात येईल. रेती |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात येऊ नये. त्याठिकाणी बंदिस्त स्वरूपाच्या वाहनांची तरतूद करण्यात यावी जेणेकरून वाहतूकीदरम्यान कोळसा रस्त्यावर पडून त्याची भुकटी होऊन प्रदूषण होणार नाही. ग्रामीण मार्गांसाठी जिल्हा परिषद व स्थानिक प्रशासनाची परवानगी घेणार किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. प्रस्तावित कोळसा खाणीत २०४ रोजगार देणार असे नमूद केले आहे. परंतु यामध्ये मॅनेजर, इंजिनियर, पर्यवेक्षक कोणत्या प्रकारचे नौकरी देणार नमूद नाही. याचा खुलासा करावा. प्रस्तावित खाणीकरिता अधिग्रहीत जमीनीला प्रति एकर किती मोबदला कोणत्या कायद्याने देणार आहे. सीएसआर मध्ये प्रथत ५ वर्षात २०४ लाख खर्च सोबत सीएसआरमध्ये भांडवली खर्च १.५ टक्के म्हणजे १.५३ कोटी तरतूद प्रमाणे खर्च करणार अशी माहिती परंतु खर्च होत नाही. याबाबत प्रस्तावकाच्या वतीने संबंधित ग्राम पंचायत, मा. जिल्हाधिकारी यांना लेखी हमीपत्र देणार याचा खुलासा करावा. खाणपट्टा क्षेत्रात ३ नैसर्गिक नाले वाहत असून ते वळविणे प्रस्तावित आहे. वळविल्यानंतर नवीन ठिकाणी होणारे शेतनिक व माती नूकसान भरपाई बाबात माहिती दिली नाही. याचा खुलासा करावा. खाण क्षेत्रातून माजरी आदिलाबाद रेल्वे लाईन व मुकुटबन पाटण राज्य मार्ग जातो येथील प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काय उपाययोजना करणार. खाणीतील कोळसा उत्खनन व ओ.बी.चे वाळु उत्पादन घेतल्यानंतर निर्माण झालेले खड्डे कशाने भरणार याबाबत माहिती द्यावी. प्रस्तावित जमीन अधिग्रहण गावातील शैक्षणिक सर्वेक्षण नावानिश्चित सादर केले नाही. ताडोबा, टिपेश्वर अभयारण्य कॉरीडोर मध्ये वाघाचा प्रवेश मार्ग व प्रजनन क्षेत्र असून वन्य प्राण्याला संरक्षणदृष्ट्या हा प्रकल्प धोकादायक राज्य वन्यजीव विभागाचे नाहरकत घेतले आहे का याबाबत माहिती द्यावी. कोळसा उत्खननामुळे प्रकल्पालगत शेतपिक नूकसान याबाबत कोठेही तरतूद नाही याचा खुलासा करावा. | क्रशींगकरिता वेगळे खड्डे खोदण्यात येणार नाहीत. खाणीतून निघणाऱ्या अधिभार ढिगाऱ्यांची ९० टक्क्यांपर्यंत विल्हेवाट लावण्यात येणार आहे. खाणकामा पूर्ण झाल्यानंतर फक्त ५.६८ हेक्टर क्षेत्राचा खड्डा अस्तित्वा राहणार आहे. १५० हेक्टर क्षेत्रात जे खाणकाम होणार आहे त्याचे पूर्णपणे पुनर्भरण करण्यात येणार आहे. |

**१३) श्री. मंगेश चामाटे, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवमताळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महोदय मी मांगली येथील रहिवासी आहे आज दिनांक शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या मांगली मार्की ४ कोळसा खाण प्रकल्पाच्या जनसुनावणी संदर्भात खालीलप्रमाणे माझे आक्षेप आहे.<br>१) मोबदला- खाण प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या शेत जमीनीचा लाभार्थ्यांना मोबदला म्हणून प्रति एकरी रू. ५०.० लाख सरसकट देण्यात यावे.<br>२) पर्यावरण परिणाम-प्रस्थापित खाणीमुळे आणि वाहतूकीच्या वाहनांमुळे हवेत पसरणारे धूर धुळीचे कण यामुळे नागरीकांच्या आरोग्य आणि इतर अबाधित शेतजमीनीच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होणार आहे.<br>३) EIA रिपोर्ट-कोणताही मोठा प्रकल्प सुरू करण्याआधी त्या प्रकल्पाचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचा शासकीय अभ्यास म्हणजे EIA रिपोर्ट यात हवा, पाणी, जमीन, प्राणी, पशुपक्षी, जंतू आणि स्थानिक जनतेच्या जीवनात होणाऱ्य परिणामांचे मोजमाप केले जाते. प्रकल्प विभागातील जनता ही शेतकरी शेतमजूर असल्यामुळे आम्हाला मिळालेला EIA रिपोर्ट हा इंग्रजी भाषेत असल्यामुळे तो समजून घेणे शक्य नाही तो आम्हाला आमच्या स्थानिक भाषेत म्हणजेच मराठीत प्राप्त करून देण्यात यावा तोपर्यंत पुढील कार्यवाही करू नये.<br>४) आरोग्य समस्या-कोळसा खाणीतून निघणाऱ्या उत्सर्जनामुळे श्वसनाचे विकार, दमा, खोकला, आणि फुफ्फुसाचे आजार उद्भवण्याची दाट शक्यता आहे, परिसरातील आरोग्य व्यवस्था यास तोंड देण्यास सक्षम नाही.<br>५) पाणी टंचाई-प्रकल्पातील खोदकामामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खाली जाण्याची शक्यता आहे त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा प्रश्न गंभीर होईल.<br>६) रस्ते वाहतूक-प्रकल्पातील कोळसा वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या अवजड वाहनांमुळे गावातील मुख्य रस्त्याची दुरावस्था होईल आणि अपघाताचे | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सर्व उपस्थितांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे म्हणणे थोडक्यात सादर करावे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाण वाढण्याची दाट शक्यता आहे त्यामुळे यावर उपाययोजना म्हणून वाहतूकीसाठी स्वतंत्र रस्ता तयार करण्यात यावा.<br>७) ध्वनी प्रदूषण- कंपनीत वापरण्यात येणाऱ्या आधुनिक उपकरणे आणि वाहतुकीच्या वाहनाच्या आवाजामुळे होणारे कर्ण कर्कश आवाज यावर उपाययोजना करण्यात यावी.<br>८) झाड तोड/जैवविविधता-प्रकल्पाच्या उभारणीसाठी होणाऱ्या झाडाच्या कत्तलीमुळे पर्यावरण समतोल राखणे कठीण जाईल झाड तोडीमुळे इथे राहणाऱ्या पशु पक्षी आणि प्राणी मात्रांचा राहण्याचा प्रश्न बिकट होईल.<br>९) रोजगार-प्रकल्पासाठी शेती गेल्यानंतर शेतीवर अवलंबून शेतकरी शेतमजूर यांच्या हाताला काम उरणार नाही आणि येथील नाले परिवर्तित केल्यामुळे आणि त्यात कंपनीतील निघणारे सांडपाणी सोडल्यामुळे मच्छीमारांचा व्यवसाय धोक्यात येईल त्यामुळे या प्रकल्पात स्थानिक लोकांना सर्वप्रथम रोजगार उपलब्ध करून द्यावा.<br>१०) जल प्रदूषण-प्रकल्पातून निघणारे सांडपाणी बाजूच्या नदी नाल्यात सोडल्यामुळे निर्माण होणारे जल संकट आणि त्यातून होणारे आजार यावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.<br>११) पुनर्वसन – प्रकल्पामुळे होणारे मांगली वसाहत यांचे पुनर्वसन हे जवळपास रस्ता लगत करून त्यंना जीवनावश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे.<br>१२) महिला सुरक्षा- प्रकल्पाम काम करण्यासाठी होणारी वर्दळीमुळे आणि बाहेरील रोजगार यांची संख्या वाढल्यामुळे आणि त्यांनी केलेल्या नशा पाणी मुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहणार आहे.<br>१३) उर्वरित शेती विषय – या प्रकल्पातील बाधित विभाग आणि जंगल यामध्ये शिल्लक राहिलेली शेतजमीन ही शेती करणे कठीण जाईल त्यामुळे ही मधातील उर्वरित शेती कंपनीने बाकी शेती प्रमाणे खरेदी करावी. असे झाले नाही तर या प्रकल्पामुळे ही शेती करणे कठीण जाईल. यामध्ये १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६२ आणि १६३ या गट क्रमांकाच्या शेतीचा समावेश आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | १४) माझी आणि माझ्या परिवारातील शेती गट नंबर ३६, २३, २०, १३१ ही मांगली शिवारात असून ती प्रकल्पापासून २ कि.मी. अंतरावर आहे यावर प्रकल्पाचा दुष्परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.<br>१५) गाव दत्तक- या प्रकल्पामुळे स्थानिक जनतेवर असे एक ना अनेक समस्या राक्ष रूपी तोंड उघडून उभे राहणार आहे त्यामुळे यावर निराकरण करण्यासाठी कंपनीने गाव दत्तक घेऊन गावातील प्रत्येक समस्यावर उपाययोजना करावी. | |

## १४) श्री. नामदेव सातघरे, पोलिस पाटील, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवमताळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी शेती प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात येत असून आम्ही आमची जमीन कंपनीला देण्यास तयार आहे. आमच्या जमीनीचा मोबदला आम्हाला एकमुस्त पद्धतीने देण्यात यावा. तसेच सीएसआर निधी आमच्या गावासाठी खर्च करण्यात यावा. मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी देखील आमची मदत करावी ही विनंती आहे. मांगली गावातील वार्ड नं. ३ चे पुनर्वसन होणे गरजेचे आहे. मांगली गावातील ५० टक्के लोकांची जमीन प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रामध्ये येत आहे. कंपनीने ६ वर्षानंतर पुनर्वसन करण्याचे सांगितले आहे. परंतु माझी शासनाला व कंपनीला विनंती आहे की स्थानिकांना इतर ठिकाणी तात्काळ जमीन उपलब्ध करून द्यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, कंपनीने बाधित गावांना सीएसआर निधीअंतर्गत प्राधान्य द्यावे. |

## १५) श्री. रविंद्र सुधाकर पोलेवार, भेंडाळा-रुईकोट, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जमीनीचा व्यवहार होत असताना महाराष्ट्र शासनाच्या स्टॅम्प ड्युटीचे देखील नूकसान झाले नाही पाहिजे आणि शेतकऱ्यांचे देखील नूकसान झाले नाही पाहिजे. जर जमीनीचा दर रू. ५० लाख नूसार ठरला असेल तर तेवढ्याच रकमेची स्टॅम्प ड्युटी देण्यात यावी. कंपनीने शेतकऱ्यांची जमीन सरसकट विकत घ्यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१६) **श्री. युसुफ कच्छी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने त्यांच्या बाजूने बोलण्यासाठी उपयुक्त वातावरण तयार केले असून त्यांच्या बाजूने बोलणारे ९० लोक आहेत तर त्यांच्या विरोधात बोलणारे फक्त १० लोक आहेत. मी बाधित शेतकरी आहे. शासनाच्या सुविधा व मेहनत करण्याची तयारी असल्यास शेती करताना नूकसान होत नाही. पूर्वीच्या काळात शेती या व्यवसायाला उत्तम मानले जात होते. परंतु आज शेती या व्यवसायास दुय्यम दर्जा दिला जात आहे. कंपनीचे प्रतिनिधी शेतकऱ्यांना पैशाचा लालच दाखवून त्यांच्याकडून शेती विकत घेत आहेत. शेतकऱ्यांकडे पैसा आल्यास त्याचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे शेतकरी हवालदिल होत आहेत. आमच्या पूर्वजांनी शेती कमावली व आज आम्ही या ठिकाणी आमचा उदर्निर्वाह करत आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळे आज कंपनीचे पदाधिकारी जगत आहेत. दोन महिन्यापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित सर्व शेतकऱ्यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधुन आजच्या जनसुनावणीकरिता उपस्थित राहण्याचे सांगण्यात आले. परंतु माझ्याशी संपर्क करण्यात आला नाही. कंपनीचे व्यवस्थापन विरोध करणाऱ्या व्यक्तिला अमिष दाखवून त्यांच्या बाजूने बोलण्यास तयार करतात, हे मी मागील २० वर्षांपासून पहात आहे. सन १९८४ मध्ये दिल्ली जवळ गुडगाव या भागात मारूतीचा प्रकल्प प्रस्तावित होता. गुडगाव हे क्षेत्र त्यावेळी सुजलाम सुफलाम होता परंतु आज तेथील नागरीक गरीब झाले आहेत. लोकप्रतिनिधींनी रोजगाराच्या संधी संपवलेल्या आहेत. खाजगीकरणामुळे रोजगार संपलेला आहे. कंपन्यांना ना-हरकत प्रमाणपत्र कशा प्रकारे देण्यात येते हे सर्वश्रुत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१७) **श्री. गजानन कुरेकार, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत कंपनीमध्ये जाणार आहे. माझ्या शेतीचा योग्य मोबदला दिल्याशिवाय मी माझे शेत प्रकल्पाला देणार नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. |

| | | |
|---|---|---|
| | | मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## १८) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी, व्ही. सुनंदा रेड्डी, वय ६८ वर्षे, भारतातील सर्वात निरोगी ज्येष्ठ औद्योगिक समर्थक पर्यावरणवादी पैकी एक आहे. आजपर्यंत मला कोणतीही आरोग्य समस्या नाही. मी एक व्यावहारिक पर्यावरणवादी आहे. व्यवस्थापनास माझ्या हार्दिक शुभेच्छा व पूर्ण पाठिंबा आहे. शाश्वत औद्योगिक विकासाला पाठिंबा देणारी मी भारतातील पहिली पर्यावरणवादी आहे. सर्वसाधारणपणे पर्यावरणवादी व स्वयंसेवी संस्था औद्योगिक विकासाला विरोध करतात; परंतु मी संपूर्ण मनाने औद्योगिक उपक्रमांना पाठिंबा देत आहे. माझ्या मते बेरोजगारी ही समाजातील सर्वात मोठी प्रदूषण समस्या आहे. भारतात दरवर्षी सुमारे १ कोटी युवक बेरोजगारांच्या श्रेणीत येतात. केंद्र व राज्य सरकारे मिळून फक्त ५ ते ६ लाखांना रोजगार देतात आणि उर्वरित ९५ लाख युवक औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून राहतात. सध्या १८ ते ३५ वयोगटातील सुमारे ४० कोटी युवक चांगल्या रोजगाराच्या संधींची प्रतीक्षा करीत आहेत. त्यामुळे राज्यात औद्योगिक विकासाची तातडीची गरज आहे. पर्यावरणवादी व स्वयंसेवी संस्था उद्योगांवर सार्वजनिक आरोग्याच्या ऱ्हासाचा आरोप करतात. मात्र भारतातील केवळ १५% लोकसंख्या उद्योग परिसरात राहते. त्यामुळे आरोग्य समस्यांसाठी केवळ उद्योगांनाच दोष देणे योग्य नाही. उर्वरित ८५% लोकसंख्येलाही औद्योगिक प्रदूषणाशिवाय विविध आरोग्य समस्या भेडसावत आहेत. पर्यावरणीय समतोल राखत औद्योगिक विकास साधण्याची हीच योग्य वेळ आहे. आपल्या औद्योगिक उपक्रमाच्या विकासासोबत पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी मी खालील सूचना देत आहे:<br><br>१. आपल्या सल्लागारांनी हवेची, पाण्याची व जमिनीची आधारभूत तपासणी (बेसलाइन सर्वेक्षण) आधीच केली आहे, ते अत्यंत चांगले व समाधानकारक | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. माझी विनंती आहे की, १० किमी त्रिज्येमध्ये राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यस्थितीचा, पीक उत्पादन स्थितीचा तसेच भूजल उपलब्धतेचा डेटा संकलित करण्यात यावा. भविष्यात पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना ठरविण्यास हा डेटा अत्यंत उपयुक्त ठरेल.<br>२. पावसाचे पाणी साठवण्यासाठी जलसंधारण संरचना व साठवण व्यवस्था उभारण्यात यावी, जे उद्योगासाठी उपयोगी ठरेल तसेच भूजल पातळी वाढविण्यास मदत करेल. उद्योगासाठी लागणारे पाणी पावसाळ्यात साठवून ठेवून अवर्षण काळात वापरण्यात यावे.<br>३. शेजारील गावांमध्ये वृक्षारोपण तसेच आपल्या अंतर्गत रस्त्यांवर, ज्या रस्त्यांवरून आपल्या वाहनांची वाहतूक होते, त्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात यावे, जेणेकरून धूळ प्रदूषणावर नियंत्रण ठेवता येईल. सामान्य वृक्षांऐवजी फळझाडे व औषधी वनस्पतींना प्राधान्य द्यावे, ज्यामुळे धूळ नियंत्रणासोबतच आसपासच्या गावांना फळे उपलब्ध होतील.<br>४. स्थानिक शिक्षित बेरोजगार युवकांना आपल्या उद्योगात रोजगार देण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.<br>५. बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यात यावे, जेणेकरून त्यांना आपल्या उद्योगात तसेच इतर ठिकाणी रोजगाराच्या संधी मिळू शकतील. जपान व कोरिया सारख्या देशांमध्ये ९५% युवक कुशल आहेत, तर भारतात केवळ ५ ते ६% युवक कुशल आहेत.<br>६. आपल्या कंपनीचे अधिकारी, शासकीय अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व ग्रामस्थ यांचा समन्वय समिती स्थापन करून सीएसआर निधीचा कृती आराखडा तयार करण्यात यावा. यामुळे गावांच्या विकासासाठी मागणी-आधारित व अर्थपूर्ण कामे हाती घेता येतील. लक्ष्य-आधारित कामांना प्रोत्साहन देऊ नये. अशा उपक्रमांमुळे आपल्या संस्थेची विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात वाढेल. | |

| | | |
|---|---|---|
| | ७. आरोग्य शिबिरे आयोजित करून आरोग्य व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासंबंधी जनजागृती कार्यक्रम राबवावेत.<br>८. दुर्बल घटकांसाठी ग्रामीण प्राथमिक शिक्षणाला पाठिंबा द्यावा.<br>पुन्हा एकदा आपल्या औद्योगिक विकासासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा व पाठिंबा आहे. त्याचबरोबर पर्यावरणीय समतोल व सुरक्षितता राखण्याची विनंती आहे. आपल्या प्रकल्पासाठी सविस्तर पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल तयार करणाऱ्या आपल्या पर्यावरण सल्लागारांचे मी अभिनंदन करते. शेवटी, सार्वजनिक सुनावणी समितीस विनंती आहे की, महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यातील झरीजामणी तालुक्यातील मार्की मांगली या गावात प्रस्तावित असलेल्या मे. सौभाग्य मर्कंटाईल प्रा. लि. यांच्या प्रकल्पास बिनशर्त मंजुरी देण्यासाठी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयास (MoEFCC) शिफारस करावी. | |

**१९) श्री. कमलाकर वाघमारे, मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी माझे शेत कंपनीला देण्यास तयार आहोत परंतु कंपनीने आमच्या कुटुंबातील एका व्यक्तिला रोजगार द्यावा, ही विनंती आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२०) श्री. सत्यनारायण यंगलवार, मुकुटबन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामध्ये आमची शेती गेली असून कंपनीतर्फे आम्हाला शैक्षणिक सुविधा व रस्त्यांची सुविधा मिळणार आहे. प्रकल्पाकरिता आमची जमीन देण्याची इच्छा आहे. शेतजमीनीला किमान रू. ६० लाख प्रति एकर प्रमाणे दर द्यावा अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, उपस्थितांनी नवीन मुद्दे मांडावे. वारंवार एकच मुद्दा उपस्थित करण्यात येऊ नये. रोजगार, पर्यावरण, जमीनीच्या मोबदल्याचा दर, टिपेश्वर अभयारण्य, जल प्रदूषण, रस्ते व नाले वळविणे, महिला सशक्तिकरण या विषयांवर चर्चा |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आली असून नवीन मुद्दे उपस्थित करण्यात यावे. |

२१) **श्री. जयंत सोमेश्वर उदकवार, मार्की, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या क्षेत्रामध्ये ४-५ कोळसा खाणी अस्तित्वात असून त्यामध्ये स्थानिकांना योग्य प्रमाणात रोजगारात प्राधान्य देण्यात आले नाही. ज्यावेळी या खाणी सुरू झाल्या त्यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कोणत्याही प्रकारचे योग्य मार्गदर्शन देण्यात आले नाही. परंतु आज सन २०२६ मध्ये या क्षेत्रा मोठ्या प्रमाणात खाणकामामध्ये डिप्लोमा असलेले युवक असून त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार दिला जात नाही. कंपनीने स्थानिक खाणकाम डिप्लोमाधारक युवकांना प्रशिक्षण द्यावे जेणेकरून कंपनीला व स्थानिक युवकांना त्याचा लाभ होईल. तसेच प्रशिक्षण दिल्यामुळे स्थानिक युवकांना दुसऱ्या ठिकाणी नोकरी मिळणे सोईचे होईल. खाण प्रकल्प ज्या क्षेत्रात येतो त्या क्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे. खाणीतून मिळणाऱ्या सीएसआर निधीचा वापर फक्त प्रकल्पग्रस्त गावांमध्ये विकासकामे करण्याकरीताच करण्यात यावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील पाठपूरावा करावा, ही नम्र विनंती आहे. कारण सीएसआर निधी हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करण्यात येतो. सदर प्रकल्प झाल्यास स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच स्थानिक शेतकऱ्यांच्या त्यांच्या जमीनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे हीच आमची मागणी आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सादरीकरण करताना कंपनीला रोजगार, पर्यावरण व सीएसआर निधीबाबत माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सीएसआर निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करण्यात येत नसून कंपनीला त्यांच्या स्तरावर खर्च करावयाचा असतो. कंपनीतर्फे सर्वेक्षण करण्यात आलेल्या परिसरातच सीएसआर निधी खर्च करावयाचा असतो. मुकुटबन येथे रस्त्याचे काम करण्यात आले आहे. मागील महिन्यात झालेल्या वे.को.लि.च्या जनसुनावणीमध्ये गावांमध्ये केलेल्या कामांची माहिती जसे की, आंगणवाडी, शाळा, दवाखान्यांकरिता देण्यात आली होती. त्याप्रमाणे या प्रकल्पामध्ये देखील प्रकल्पग्रस्त गावांमध्येच सीएसआर निधी खर्च करण्यात येईल व त्याबाबत सादरीकरणामध्ये माहिती देण्यात आली आहे. |

२२) **श्री. अमर नामदेवराव सातघरे, मौजा हिरापूर, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी स्थानिक शेतकऱ्यांच्यावतीने निवेदन सादर करत आहे. या ठिकाणच्या ९९ टक्के शेतकऱ्यांचे प्रकल्पाला समर्थ आहे. तसेच मी सुशिक्षित बेरोजगार असून मी देखील प्रकल्प झाला पाहिजे या मताचा आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२३) **श्री. शुभम गोंडे, पांढरकवडा (लहान), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी शेजारच्या मार्की मांगली-२ या खाणीमध्ये कार्यरत आहे. काही लोकांना कंपनी चालु झाल्यामुळे फायदा व नूकसान आहे असे वाटते. आम्हाला महिन्यातुन फक्त १८ दिवस कामाला बोलावले जाते. आमचे ४० कामगारांचे सन २०१८ पासून आजपर्यंत भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा करण्यात आले नाही. याबाबत पोलिस प्रशासनाकडे गुन्हा दाखल केला असून त्याबाबत न्यायालयात दाद मागणार आहोत. स्थानिकांना कंपनीमुळे फायदा होईल असे वाटत असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती काही वेगळीच आहे. कामगार आयुक्त व लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करण्यात आला परंतु त्याचा निर्णय झाला नाही. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपण याबाबत कामगार आयुक्तांकडे तक्रार द्यावी. त्याबाबत योग्य ती कार्यवाही कामगार आयुक्तांकडून करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे पाठपुरावा करण्यात येईल. |

२४) **श्री. आशिष फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या क्षेत्रातील कंपन्यांतर्फे सुरूवातीला महिना-दोन महिने योग्य वेतन देण्यात येते व त्यानंतर स्थानिक कामगारांना कामावरून काढण्यात येते. याबाबत कामगार आयुक्तांकडे बरेच वेळी तक्रारी करण्यात आल्या परंतु त्याचा निकाल लागला नाही. झरी तालुक्यातील बेरोजगारांच्या प्रश्नाबाबत आपणाकडे निवेदन सादर करण्यात येईल. आपण दिलेल्या आश्वासनाबाबत मी आपला आभारी आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, कामगार आयुक्तांतर्फे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. |

२५) **प्रकल्प प्रवर्तक, मे. सौभाग्य मर्कंटाईल प्रा. लि.:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | येथे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचे मी स्वागत करतो व माझ्या कंपनीद्वारे सर्व सूचनांचे पालन करण्यात येईल असे मी आश्वासन देतो. आमची कंपनी फार छोटी असून या प्रकल्पामध्ये २०१ हेक्टर जागेमध्ये फक्त ६०० टन इतके उत्पादन घेण्याचे प्रस्तावित आहे. या क्षेत्रातील इतर खाणी किंवा वे.को.लि.च्या खाणींमधून १००० टन प्रतिदिन यापेक्षा जास्त प्रमाणात उत्पादन घेतले जाते. या खाणीची जमीन दोन भागांमध्ये विभागली गेली आहे. पहिला भाग दक्षिण व दुसरा भाग उत्तर आहे. सुरूवातीला दक्षिण भागामध्ये उत्खनन घेतले जाईल |

| | |
|---|---|
| | व दहाव्या वर्षापर्यंत दोन्ही भागांमधून उत्खनन घेतले जाईल. जमीनीचा दर जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापन अधिनियमानूसार जास्त देण्यात येईल. शेतकरी जमीन द्यायला तयार असेल व कंपनी त्या दराने घ्यायला तयार असेल तरच प्रकल्प कार्यान्वित होईल. शेतकऱ्यांच्या अनुमतीविना आम्ही प्रकल्प पुढे नेणार नाही. तसेच जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेमध्ये कोणीही मध्यस्थी राहणार नाही. शेतकरी व कंपनीमध्ये जमीनीच्या दराबाबत संगनमत झाल्याशिवाय जमीन अधिग्रहीत करण्यात येणार नाही. तसेच यामध्ये तिसरा माणूस राहणार नाही याची खात्री देण्यात येत आहे. सीएसआर निधीमधून विकास कामे करण्याबाबत ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव घेण्यात येईल. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव शासनाकडे परवानगी करिता सादर करण्यात येईल. परवानगी मिळाल्यानंतर सीएसआर निधी फक्त संबंधित ग्रामपंचायतीमध्येच खर्च करण्यात येईल. रस्ते, नाले व विद्युत वाहिनी वळविण्याबाबत संबंधित विभागांकडून परवानगी मिळाल्यानंतरच त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. केंद्रीय जल विभागाकडून आम्हाला परवानगी मिळालेली आहे. तसेच या प्रकल्पामध्ये कोणत्याही वन जमीनीचा समावेश नसल्याने वन विभागाकडून देखील ना-हरकत प्रमाणपत्र मिळालेले आहे. केंद्र सरकारच्या बांधकाम विभागाने (CPWD) तयार केलेली मानक (standard) वास्तु/बांधकाम नकाशा योजना वन विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर आराखडा शेवटच्या टप्प्यात असून नजीकच्या काळात त्यास मंजूरी मिळण्याची शक्यता आहे. वन्य प्राणी संवर्धन आराखडा पांढरकवडा तालुक्यातील वन विभागाच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव नागपूर येथील कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास अंतिम मान्यता नजीकच्या काळात मिळयाची शक्यता आहे. खाणकामामधून निघणारे अधिभार ढिगारे खाण क्षेत्रातच जमा करण्यात येईल. सुरूवातीच्या ३ वर्षातील अधिभार ढिगारे खाण परिसरातच टाकले जातील. खाण क्षेत्राबाहेर कोणत्याही प्रकारचे डंपिंग करण्यात येणार नाही. खाण क्षेत्रालगत नाला बांधण्यात येईल जेणेकरून खाण परिसरातील पाण्याचा विसर्ग सदर नाल्यातून करणे शक्य होईल. त्यामुळे खाण परिसरालगतची शेती बाधित होणार याची काळजी घेण्यात येईल. सदर नाल्यालगत काही ठिकाणी गरजेनूसार संरक्षण भिंत बांधण्यात येईल. तरी देखील नूकसान झाल्यास शासनाच्या नियमाप्रमाणे बाधितांना नूकसान भरपाई देण्यात येईल. या प्रकल्पाची एकूण गुंतवणूक ही रू. १०६ कोटी इतकी आहे. कॉर्पोरेट पयावरणीय जबाबदारी अंतर्गत कंपनीतर्फे रू. १५३ लाखची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी पर्यावरणीय तपासणी करण्यासाठी लागणाऱ्या उपकरणांवर करण्यात येतो. सदर प्रकल्पामधून २०४ रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. त्यापैकी १९० रोजगार खाणीमध्ये असतील व उर्वरित १४ रोजगार वाळू प्रकल्पामध्ये असतील. रोजगाराच्या प्रवर्गाची माहिती अंतिम अहवाल सादर करण्यापूर्वी मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे सादर करण्यात येईल. रूग्णवाहिकेची सेवा पूरविण्यात येईल तसेच दवाखानादेखील सीएसआर निधीतून पूरविण्यात येईल. परिसरातील शेतमजूरांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुविधा राबविण्यात येईल. या माध्यमातून शेतमजूरांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |

**२६) <u>श्री. श्रीनिवास नारायण चिलकावार, मुकुटबन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने जमीनीच्या दराबाबत माहिती द्यावी. तीन वर्षांपूर्वी देखील अशीच जनसुनावणी झाली होती. जमीनीच्या दराची जनसुनावणीदरम्यान घोषणा करण्यात यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत घेण्यात येत आहे. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | | इतर मुद्यांबाबत देखील जनसुनावणीमध्ये चर्चा करण्यात आली आहे. सदर जनसुनावणी जमीनीचा दर ठरविण्यासाठी घेण्यात आलेली नाही. कंपनीने सांगितले आहे की, शेतकऱ्यांसोबत थेट संवाद साधून विचार विनिमय करून जमीन खरेदी करण्यात येईल. याबाबत कंपनीने योग्य ती खात्री घ्यावी जेणेकरून भविष्यात कोणत्याही तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त होणार नाही. झरी व वणी तालुक्यात प्रदूषणासंबंधी मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत असतात. कंपनीने प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रकल्पाच्या सुरूवातीच्या काळातच योग्य त्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी जेणेकरून वायु व जल प्रदूषणाबाबत तक्रारी येणार नाहीत. तसेच ब्लास्टींग व ध्वनी प्रदूषणाबाबतच्या नियमांचे देखील कंपनीने खाणकाम करतेवेळी काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही नियमांचे उल्लंघन होणार नाही याची कंपनीने खबरदारी घ्यावी. रोजगार देताना स्थानिक युवकांना त्याच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्य देण्यात यावे. तसेच कंपनीने कौशल्य विकास कार्यक्रम राबवावा जेणेकरून स्थानिकांमध्ये कौशल्याचा विकास होईल व परिसरातील नागरीक स्वयंरोजगाराकडे वळतील. त्यामुळे स्थानिक नागरीकांना या कंपनीमध्ये, वे.को.लि.मध्ये तसेच परिसरातील इतर उद्योगांमध्ये रोजगार मिळू शकणार व टिपेश्वर अभयारण्यामध्ये देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. कंपनीने स्थानिकांना दिलेल्या अश्वासनांची पूर्तता करावी. |

सदर जनसुनावणीकरिता ऑनलाईन माध्यमातून कोणताही सहभागी उपस्थित नव्हते. संपूर्ण पर्यावरण विषयक जनसुनावणीदरम्यान छायाचित्रीकरण करण्यात आले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**प्राप्त झालेले १९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.**

**(सुशिलकुमार राठोड)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(विकास मीना, भा.प्र.से.)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ,
जिल्हा यवतमाळ.